
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सव्वीसावे / अंक ११ / नोव्हेंबर २०२५

## संपादकीय

### 'वंदे मातरम्'ची दीडशे वर्षे

'वंदे मातरम्' हे संपूर्ण भारतात प्रसिद्ध असलेले गीत आहे. जन-गण-मन प्रमाणेच या गिताला 'राष्ट्रीय गीत' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. बंगाली लेखक श्री बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी १५० वर्षांपूर्वी म्हणजे १८७५ मध्ये हे गीत लिहिले. ७ नोव्हेंबर १८७५ रोजी 'बांगला बाजार' या पत्रिकेत हे गीत पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आले होते. त्यानंतर तीनच वर्षांनंतर बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी 'आनंदमठ' नावाची कादंबरी लिहिली. या कादंबरीत त्यांनी या गीताचा समावेश केला. १८८२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या त्यांच्या कादंबरीतील, 'एक भिक्षूक आगगाडीतून प्रवास करताना खिडकीतून बाहेर बघत आपल्या देशाचे बहारदार वर्णन करणारे हे गीत गातो' असे वर्णन कादंबरीत केले आहे. त्यानंतर अल्पकाळातच हे गीत संगीतबद्ध करण्यात आले. तेव्हापासून हे गीत जनमानसात चांगलेच प्रसिद्ध झाले आहे.

'वंदे मातरम्' ही कविता संस्कृतप्रचुर असून, कवितेत भारताची अनेक वैशिष्ट्ये सांगितली आहेत. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत ब्रिटिश सत्ता भारतात चांगलीच स्थिर झाली. या सत्तेला उखडून टाकण्यासाठी भारतात स्वातंत्र्य सैनिकांची एक फळी तयार झाली. याच फळीने १८५७ चे स्वातंत्र्य समर घडवून आणले होते. या प्रयत्नांना म्हणावे तसे यश मिळाले नाही. तरीही देशभक्तीची लहर मात्र सर्वत्र पसरू लागली. १८५७ च्या घटनेनंतर भारताचा कारभार इस्ट इंडिया कंपनीकडून काढून घेऊन ब्रिटिश पार्लमेंटकडे सोपविण्यात आले. या बदलांचा परिणाम शालेय शिक्षणावर दिसू लागला. भारतीय शाळांमधून 'गॉड सेव्ह द क्वीन' अशी प्रार्थना म्हणण्यात यावी असे आदेश १८७० च्या दशकात निघाले. त्याला प्रत्युत्तर म्हणून बंकिमचंद्रांनी ही कविता लिहिली असे सांगतात. बंकिमचंद्र तसे पाहता सरकारी नोकरीत होते. परंतु शिक्षण विभागाने दिलेला आदेश त्यांना मुळीच आवडला नाही. आपल्या देशातील मुलांसाठी स्वतंत्र गीत असावे असे त्यांचे मत होते. त्यानुसार हे गीत रचून त्यांनी शालेय संस्थांना उपलब्ध करून दिले. ब्रिटिश राज्यकर्त्यांना मात्र हे आवडले नाही. त्यांनी आनंदमठ या कादंबरीवर बंदी घातली. तसेच, शाळेत वंदे मातरम् हे गीत गाऊ नये असे

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

आदेश काढले. या आदेशाचे पालन केले नाही म्हणून एका शाळेतील प्रत्येक मुलाला ५ रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता अशी नोंद आहे.

भारतीय काँग्रेसने वंदे मातरम् या गीताचे महत्त्व ओळखून त्या गीताचा समावेश त्यांच्या अधिवेशनात करायला सुरुवात केली. १८९६ मध्ये कलकत्त्यात भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात श्री. रवींद्रनाथ टागोर यांनी स्वतः हे गीत गायले होते. त्यानंतर अनेक गायकांनी मंचावर हे गाणे सादर केले. १९०५ मध्ये जेव्हा काँग्रेस पक्षाचे अधिवेशन बनारसला भरले तेव्हा श्रीमती सरला देवी चौदुराणी यांनी हे गीत मंचावर सादर केले होते. १९०७ साली मॅडम भिकाजी कामा जेव्हा भारतीय ध्वज घेऊन जर्मनीतील स्टुटगार्ट या गावी अधिवेशनासाठी गेल्या, तेव्हा त्यांनी सादर केलेल्या तिरंगी ध्वजावर मध्यभागी 'वंदे मातरम्' असे शब्द लिहिलेले होते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे राष्ट्रगीत कोणते असावे यावर चर्चा होऊ लागली. राष्ट्रगीत म्हणून श्री. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेल्या 'जन-गण-मन' या गीताला मान्यता देण्यात आली. वंदे मातरम् या गीताला देखील राष्ट्रगीताचा मान मिळावा अशी काही सदस्यांची इच्छा होती. याला मुस्लीम लीग या राजकीय पक्षाने विरोध दर्शविला. याचे कारण वंदे मातरम् या गीतात हिंदू देवदेवतांचा उल्लेख आहे. यावर तोडगा काढण्यासाठी 'वंदे मातरम् गीताच्या सहा कडव्यापैकी केवळ पहिली दोनच कडवी घेण्यात यावीत' असे सुचविण्यात आले. याचे कारण देवदेवतांचा उल्लेख कवितेच्या तिसऱ्या कडव्यापासून होतो. त्यानंतर या गीताची दोन कडवी 'राष्ट्रगान' म्हणून स्वीकारली गेली. प्रत्यक्षात वन्दे मातरम् या गीताचा फारसा उपयोग केला जात नाही असे दिसते. 'संपूर्ण वंदे मातरम्' तर फारच कमी वेळा गायले जाते.

'वंदे मातरम्' हे गीत अतिशय सुंदर आणि अर्थपूर्ण आहे. शास्त्रीय संगीताचा आधार घेऊन हे गीत गायले, की ते प्रेक्षकांचे मन मोहून टाकते. इसवीसन २००२ मध्ये बीबीसीने 'जगभरातील १० उत्तम गीते कोणती?' यासाठी एक सर्वेक्षण केले होते. जगभरातून निवडलेल्या ७००० गाण्यांमध्ये वन्दे मातरम् दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे सिद्ध झाले! अशा या प्रसिद्ध गीताला दीडशे वर्षेपूर्ण झाली म्हणून देशभरात विविध स्तरांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शैक्षणिक संस्थांबरोबरच शासकीय, निम-शासकीय, तसेच खाजगी संस्थांनी या कामी पुढाकार घ्यावा असे मी सुचवू इच्छितो. त्याचबरोबर हे गीत पूर्ण स्वरूपात गाऊन त्याचा अर्थ समजावून देणे आवश्यक आहे. विशेष हे की, हे गीत भारताच्या इतर भाषांमध्ये रूपांतरित करण्यात आले आहे. त्याचा उपयोग करून कवितेचा अर्थ मातृभाषेतून समजावून देणे शक्य आहे. असे झाले तरच या गीताची महती पुढच्या पिढीला कळेल.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ११/नोव्हेंबर २०२५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक ५ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | भान जागे करणारे आणि भानावर आणणारे 'समरसता साहित्य संमेलन' | अश्विनी मयेकर | ३ |
| ३) | वाळवी | नरेंद्र गोळे | ५ |
| ४) | 'समग्र' टिळक : एक स्मरण | डॉ. आशुतोष जावडेकर | ९ |
| ५) | जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय - किल्ले रायगड | दिलीप नारायण वंडलकर | ११ |
| ६) | उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १६ |
| ७) | भारतीय सनातन नीतिशास्त्रांची समृद्ध परंपरा: परिचय व जीवनमूल्ये (भाग १) | डॉ. महेश भानुशाली | २३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# भान जागे करणारे आणि भानावर आणणारे
## 'समरसता साहित्य संमेलन'

*दिनांक २ व ३ ऑगस्ट रोजी नांदेड येथे 'समरसता साहित्य संमेलन' संपन्न झाले. याचा आढावा ज्येष्ठ लेखिका अश्विनी मयेकर यांनी प्रस्तुत लेखात घेतला आहे. - संपादक*




'समरस समाज' ही समतेची पूर्वअट आहे. त्याकरिता समाजाच्या विविध स्तरांतील माणसांना एकत्र आणण्याच्या संधी निर्माण करण्याची गरज असते. त्या करण्याचे विविध मार्ग आहेत. मात्र मार्ग कोणताही असो, मूळ हेतू साध्य होणं सहजसोपे नसते. 'समरसता साहित्य संमेलन' हे अशा मार्गांपैकी एक. कोणताही मूल्यविचार समाजात रुजण्यासाठी तो तळागाळापर्यंत झिरपायला हवा. सर्वसामान्यांनी तो आपलासा करायला हवा. विविध साहित्यप्रकारांतून तो मांडला गेला तर तो पटकन रुजायला मदत होते. कारण साहित्याशी कोणत्याही संवेदनशील व्यक्तीची नाळ पटकन जुळते. तिला विचारप्रवृत्त करते, कृतीप्रवण करते. समरसतेचे विचार आपल्या साहित्यकृतीतून शब्दबद्ध करणाऱ्या लेखकांची, त्या साहित्याची समाज-मनावर होणाऱ्या परिणामांची चिकित्सा करणाऱ्या विचारवंत-समीक्षक-पत्रकारांची आणि या साहित्यावर प्रेम करणाऱ्या वाचकांची प्रत्यक्ष भेट म्हणजे हे संमेलन. संमेलनाच्या मूळ हेतूचे भान कायम राखत, त्याला अधिक बळकटी देणारी अशी संमेलनाची रचना हे या संमेलनाचे वैशिष्ट्य. यंदा संमेलनाची द्वि-दशकपूर्ती झाली, तीही वाढत्या उपस्थितीत. तेव्हा हा उपक्रम यशस्वी होतो आहे, समाजात रुजतो आहे असे नक्की म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून स्वतःचे संमेलनशुल्क भरून लोक सहभागी झाले होते. (व्यवस्था उत्तम होती. भोजन व निवासासाठी मिळून हे शुल्क होते फक्त २०० रुपये. यासाठी आयोजकांचे कौतुक करावे तितके कमीच!) स्थानिक साहित्यप्रेमी आणि बाहेरून आलेल्यांची संख्या जवळजवळ सहाशेच्या घरात होती. या संमेलनाच्या पूर्वतयारीसाठी नांदेडमधील स्थानिक कार्यकर्ते आपापले व्यापताप सांभाळून गेले तीन-साडेतीन महिने अथक काम करत होते. त्यांचे परिश्रम सार्थकी लागले. पूर्वतयारी आणि पूर्ण तयारी ही संघकामातली विशेषता या संमेलनातूनही दिसून आली. हा विषय संघपरिवारातील संघटनेने हाती घेऊन त्यात भरीव काम करत असल्याने पोटदुख्यांची, विघ्नसंतोषी लोकांची संख्या कमी नव्हती! त्यातूनच, 'हे संमेलन कसं पार पडतं हे बघतोच आम्ही', असा धमकीवजा इशाराही देण्यात आला होता ! पण त्याने कार्यकर्ती मंडळी विचलित झाली नाहीत. उलट, संमेलन यशस्वी करून दाखवायचेच असा चंग त्यांनी बांधला.

'नव्वदोत्तरी साहित्य आणि समरसता' हे या संमेलनाचे मध्यवर्ती सूत्र होते. नव्वदच्या दशकापासून आलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेने आणि विज्ञान-तंत्रज्ञानातील क्रांतीने जे आमूलाग्र बदल समाजात झाले त्यातून समरसता हे जीवनमूल्य रुजायला काही मदत झाली का, हे मूल्य तत्कालीन विविध साहित्यप्रकारांतून प्रतिबिंबित झाले आहे का, नसेल तर त्यामागची कारणे...अशा विविध मुद्यांना धरून 'समरसता विचारमंथन' दोन दिवसांत झाले. विषय पुरेसे गंभीर असूनही, दोन्ही दिवसांतल्या प्रत्येक सत्राला सभागृह भरलेले होते हे उल्लेखनीय! प्रत्येक वक्त्याला त्याच्या मांडणीची पोचपावती दिली जात होती. साहित्यप्रेमामुळे आणि 'समरसता' हे जीवनमूल्य समाजात रुजण्याची गरज लक्षात आल्याने आलेली ही मंडळी होती. ही जमवलेली गर्दी नव्हती तर, दर्दींचे एकत्रिकरण होते.

जशी गर्दी परिसंवादांना होती तशीच ती कविसंमेलनाला आणि गजल मुशायऱ्यालाही होती. निमंत्रितांचे कविसंमेलन सर्वांना सामावून घेऊ शकले नाही तेव्हा खुले कविसंमेलनही झाले आणि सर्वांची वाहऽवा मिळवून गेले.

समरसता हे जीवनमूल्य रुजण्यासाठी आपले अवघे आयुष्य देणारे गिरीशकाका प्रभुणे, दादा इदाते, पांडव सर यासारख्या मंडळींचे सभागृहात उपस्थित असणे हे कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारे होते. मुख्य म्हणजे त्यामुळेही संमेलनाला एक वलय प्राप्त झाले होते.

तरुणांचा आयोजनात आणि संमेलनात जाणवण्या-जोगा सहभाग हे या संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य. संमेलनाध्यक्ष साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक पद्मश्री नामदेव कांबळे यांच्या साहित्यावर, त्यातील विविध पैलूंवर साधकबाधक चर्चा एका परिसंवादात झाली. चर्चा करणारे चारही जण अगदी विशी-पंचविशीतले तरुण होते. आपापल्या विषयाची तयारी त्यांनी अतिशय मनःपूर्वक केली होती. तरुणांचा असा सर्वपरिने सक्रिय सहभाग आशादायी आहे.

समाजाच्या तळागाळातील विविध घटकांचे प्रतिनिधीत्व जसे या संमेलनात होते, तसे 'किन्नर विकास परिषदे'च्या कार्यकर्त्यांची उपस्थितीही लक्ष वेधून घेत होती. प्रत्यक्ष संमेलनातला त्यांचा वावर मनमोकळा होता. त्यांच्याशी बोलण्याची, त्यांचे प्रश्न समजून घेण्याची उत्सुकता अनेकांना होती. त्यांच्याशी जो संवाद झाला त्यातून त्यांच्या प्रश्नांची, वेदनेची दिसलेली झलक अस्वस्थ करणारी होती. संघ परिवाराच्या माध्यमातून यावर काम करण्याचा, आयुष्याला सकारात्मक दिशा देण्याचा त्यांचा प्रयास संघरचनेवरील विश्वासाची पावती होती.

'समरसता' या संकल्पनेची व्याप्ती अधोरेखित करणारे, लेखनातून अनेकविध विषय संवेदनशीलतेने हाताळण्याची प्रेरणा आणि त्यातून अनेक प्रश्नांची उकल करण्याचे बळ देणारे हे संमेलन समरसतेच्या कामातील मैलाचा दगड ठरेल, याची खात्री आहे.

साहित्य संमेलन हे किती आशयघन असावे, त्यातून समाजाला काय द्यावे याचे लख्ख भान असलेल्या या संमेलनाचा कित्ता जुन्यापुराण्या साहित्य संमेलनासह अनेकांनी गिरवावा असाच!

डॉ. प्रसन्न पाटील, रवींद्र गोळे, डॉ. रमा गर्गे, डॉ. राजेंद्र नाईकवाडे हे या कामाशी जोडले गेलेले स्नेही आणि त्यांच्या बरोबरीने या कामी उत्साहात सहभागी असणारे शेकडो कार्यकर्ते यांचे अभिनंदन आणि त्यांच्या या कामाला अभिवादनही.

**– अश्विनी मयेकर**

●●●

# वाळवी

*'वाळवी' हा एक चिंता निर्माण करणारा विषय आहे. याबद्दलची माहिती प्रस्तुत लेखात. परंतु ती नष्ट करण्याबाबतचा कायमस्वरूपी ठोस उपाय अजूनतरी नाही, याबाबतचा प्रस्तुत लेख. – संपादक*

शहरांतून २५ ते ५० वर्षे जुन्या इमारती हल्ली रि-डेव्हलपमेंटला जात आहेत. अशा इमारतींतील इलेक्ट्रिकचे बोर्ड उघडले तर खालीलप्रमाणे दृश्य दिसणे सहज शक्य असते. त्यात वाळवीची वारुळे झाल्याचे दृश्य दिसत आहे. चौकटीची लाकडे वाळवीने खाऊन टाकलेली दिसत आहेत. त्या काळात निर्माण झालेल्या इमारतींतील वायरिंग कन्सिल्ड असे. भिंती, फरशीचे तळ, काँक्रीटच्या स्लॅब्स यातून घरभर फिरवलेल्या पी.व्ही.सी.च्या नळ्यांतून वायरिंग करत असत. त्याच नळ्या थेट पायथ्यातील जमिनीपासून घरात कुठवरही पोहोचण्याकरता वाळवीस मार्ग उपलब्ध करून देत असतात. मग, लाकडी चौकटी भिंतींत बसवून, त्यावर प्लास्टिकचे शीट स्क्रुने कसून इलेक्ट्रिकचे बोर्ड बनवले जात. साहजिकच त्या नळ्यांत आर्द्रता, ओलावा, पाणीही तत्त्वतः राहू शकत असल्याने, तसेच जुन्या लाकडाच्या चौकटींच्या स्वरूपात आयते खाद्यही उपलब्ध असल्याने वाळवीस बोर्डांतून घरे करणे, वारुळे उभी करणे सहज शक्य असे. मात्र चाळीस ते पन्नास वर्षांपूर्वी जेव्हा कन्सिल्ड वायरिंगची फॅशन आलेली नव्हती तेव्हा निर्माण झालेल्या घरांत, वाळवीची वारुळे इलेक्ट्रिक बोर्डांत झालेली दिसून येत नाहीत.



लाकूड कोरून खाणारे वाळवी हे कीटक, उधई या नावानेही ओळखले जातात. वाळवीला 'पांढऱ्या मुंग्या (व्हाईट आंटस)' असेही म्हणतात. या किटकांना संस्कृत भाषेत 'वल्म' तर इंग्रजी मध्ये 'टर्माइट' असे म्हटले जाते. वाळवीचा प्रसार जगात सर्वत्र आहे. वाळवीची सहा कुले असून, सुमारे दोन हजार जाती आहेत! भारतात त्यांच्या सुमारे २६० जाती आढळून येतात.

असे म्हणतात की, सागवानी लाकडास वाळवी लागत नाही. त्यामुळे घराच्या बांधकामात सागवानाचा उपयोग केला जातो. मात्र वाळवी ही कीड, सागवानाच्या खोडाची कोवळी सालही कुरतडून खाते. त्यामुळे जंगलातील सागाच्या झाडांच्या बुंध्यांवर वाळवीची नक्षी सर्वत्रच दिसून येत असते. वाळवी हा कीटक वसाहत करून लाकडामध्ये राहतो. दमट जागा, जुन्या लाकडामध्ये वाळवीचे अस्तित्व असते. या उपद्रवी कीटकांमुळे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. वाळवीचा खाद्य म्हणूनही वापर केला जातो. ही अतिशय पौष्टिक असते !

वाळवीच्या शरीराचे डोके, धड, उदर असे तीन भाग असतात. डोके लहान असून, त्यावर स्पर्शकांची एक जोडी असते. स्पर्शक अनेक खंडांचे असून मणिरूपी असतात. संयुक्त नेत्रांची आणि साध्या नेत्रांची एक जोडी असते. मुखांगे अन्न चघळून खाण्यासाठी असतात. पंख उदरापेक्षा लांब असतात. बहुधा पंख गळून पडतात. त्यांचे रंग तपकिरी, पिवळा, काळा इ. विविध प्रकारांचे असतात. त्यांच्या काही जाती दिवसा, तर काही रात्री उड्डाण करतात.



वाळवी 'समाजप्रिय कीटक' असून वारुळात राहतात. वारुळात त्यांच्या वसाहती असतात. वसाहतीत राहणाऱ्या वाळवींची शरीर संरचना, कार्य व वर्तन यांनुसार कामकरी, सैनिक व प्रजननक्षम अशी विभागणी झालेली असते.

कामकरी वाळवी : कामकरी वाळवींचा रंग बाल्यावस्थेत पांढरा असतो, तर प्रौढावस्थेत फिकट बदामी होतो. शरीराची ठेवण लहान असते. आकारमानाने त्या सर्वांत लहान असतात. मुखांगात जबडे (जंभ) असतात. डोळे नसल्यामुळे कामकरी आंधळ्या असतात. धडावर पंख नसतात. प्रजननक्षमता नसल्यामुळे वांझ असतात. कामकरी वाळवी वारुळातील इतरांसाठी व वारुळासाठीची कामे करतात. अन्न गोळा करणे, अंडी व लहान वाळवींची निगा राखणे, प्रजननक्षम वाळवींना अन्न देणे, वारूळ बांधणे, त्यांतील कोठड्या, मार्गिका स्वच्छ ठेवणे अशी कामे त्या करतात. कामकरी वाळवी नेहमी वारुळात असतात आणि क्वचितच वारुळाबाहेर येतात. वारुळात सामान्यपणे कामकरी वाळवी संख्येने अधिक असतात. कुजलेले लाकूड व कवकबीजाणू हे त्यांचे अन्न असते. वाळवींमध्ये कामकरी ह्या सर्वांत उपद्रवी असून ते लाकूड खाऊन व पोखरून प्रचंड नुकसान करतात.

सैनिक वाळवी : सैनिक वाळवी मध्यम आकारमानाच्या असतात. त्यांचा रंग फिकट बदामी असतो. सैनिक वाळवीचे डोके तुलनेने मोठे व चपटे असते. मुखांगातील जंभ मोठे असून, शत्रूचा प्रतिकार करण्यासाठी चावा घेऊ शकतात. काही सैनिक वाळवींमध्ये डोके जास्त उंच असून, जबडे लहान असतात. वारुळामध्ये छिद्रे पाडण्यासाठी त्यांचा वापर होतो. काही सैनिक वाळवींमध्ये शीर्षग्रंथी असतात, ज्यांतून विशिष्ट स्राव येतो. सैनिक वाळवींची संख्या कामकरी वाळवींपेक्षा तुलनेने खूपच कमी असते. सैनिक वाळवींना पंख नसतात, तसेच त्या प्रजननक्षम नसतात. सैनिक वाळवी स्वत:हून अन्न खात नाहीत, कामकरी वाळवी त्यांना अन्न भरवितात. सैनिक वाळवी बहुतकरून वारुळाच्या वेगवेगळ्या दारांजवळ असतात. वारुळातील सदस्यांचे रक्षण करणे हे त्यांचे काम असते. घुसखोरांचा चावा घेणे, त्यांच्यावर क्षोभक विषे, सरस व क्लथनरोधी रसायनांचा मारा करून ठार करणे अथवा पळवून लावणे अशा प्रकारे त्या वारुळाचे रक्षण करतात.

प्रजननक्षम वाळवी: प्रजननक्षम वाळवी प्रजननाचे कार्य करतात. त्यांना नर-मादी किंवा राजा-राणी म्हणतात. त्यांचा रंग गडद तपकिरी असतो. नर-मादी दोन्ही पंखहीन असून, त्यांची निर्मिती पंखधारी मातापित्यांकडून झालेली असते. राणीचे उदर जास्त लांब असून, राणी सुमारे ११ सेंमी. लांब, तर नर २ सेंमी. लांब असतो. राणीच्या उदरात मोठी प्रजननसंस्था असून, तिच्या उदरात अंडी असल्यामुळे ती फुगीर दिसते. कामकरी वाळवी राजा-राणीची सर्व प्रकारे काळजी घेतात.

मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे वाळवीच्या निवासाला- देखील वारूळ म्हणतात. ओलसर लाकूड, वाळलेले लाकूड यावर, जमिनीखाली, तसेच जमिनीवर वाळवी वारूळ करते. ओलसर लाकडात राहणारी वाळवी आकाराने मोठी असते. जमिनीखालील वाळवी संख्येने जास्त असून, त्यांची संख्या एका वारुळात दोन लाखांपर्यंत असते. जमिनीखाली बिळे व छिद्रे पाडून वाळवी वारूळ तयार करतात. त्यामुळे जमिनीवर मातीचा ढिगारा दिसतो. वाळवीच्या काही जाती लाकूड खातात. खाताना लाकूड कुरतडले जाते. त्या लाकडात कोठड्या (खोल्या), पुढे मोकळी जागा अथवा सज्जे तयार करतात.

जमिनीवरील वारुळाचे आकार सरळसोट झाडासारखे, फांद्या असलेल्या झाडासारखे, ओबडधोबड असे विविध असते. वारुळाच्या आकारमानातही विविधता आढळते. वारुळाचा तळाकडील व्यास ३-४ मीटर व उंची ६ मीटरपर्यंत अथवा जास्त असते. वारुळाचा तळ भक्कम असतो. वारूळ तयार करण्यासाठी माती, चिखल, लाळ व विष्ठा वापरली जाते. वारुळाच्या आत कोठड्या, सज्जे, मार्ग, मार्गिका यांचे जाळे असते. राजा-राणीची कोठडी तळावरील भागात असते. तिला राजकोठडी म्हणतात. याच भागात अन्न साठविण्यासाठी कोठड्या असतात. कामकरी वाळवींच्या कोठड्या आतील भागात असतात. वारुळाच्या दर्शनी अथवा बाहेरच्या भागात छिद्रांजवळ सैनिक वाळवीच्या कोठड्या असतात. वारुळाचे आतील तापमान बाहेरच्यापेक्षा जास्त असते. बाष्पनियंत्रण व वायुवीजन चांगले घडून येते. काही वारुळे झाडांवरही असतात. वारुळामुळे वाळवीला आसरा व संरक्षण मिळते.

पोषण : शर्करा (सेल्युलोज) हे वाळवीचे मुख्य अन्न आहे. लाकूड, गवत, पाने, कापूस, कागद, पुठ्ठा, ह्यूमस, शेणखत इत्यादींपासून वाळवी शर्करा मिळवितात. अन्न मिळविण्यासाठी कामकरी वाळवी वारुळाबाहेर पडतात आणि अन्न खाऊन वारुळात परत येतात. त्यानंतर ओकारी काढतात अथवा गुदद्वारातून अन्न बाहेर टाकतात. गुदद्वारातून टाकलेले अन्न विष्टेपेक्षा वेगळे असते. दोन्ही प्रकारांचे अन्न राजा-राणी, सैनिक व अर्भक वाळवी यांना भरविले जाते. या अन्नात सहजीवी आदिजीव असतात. हे आदिजीव विकरे स्रवतात. काही जातींच्या वाळवीमध्ये सहजीवी आदिजीवांऐवजी आतड्यातील जीवाणू असतात. जीवाणूंमध्येही ही विकरे असतात आणि ते शर्करेचे पचन करतात. वाळवीच्या काही जातींमध्ये वाळवीच ही विकरे स्रवते. वाळवीला प्रथिनांचीदेखील गरज असते. त्याकरिता ती दुसऱ्या वाळवीला खाते. कवके खाऊनही वाळवी प्रथिने मिळविते. काही वाळवी सहजीवी कवकांची लागवड करतात, त्याला 'कवक उद्यान' म्हणतात. त्यात कर्बोदक भरपूर प्रमाणात असते.

संदेशवहन : वाळवी समाजप्रिय कीटक असल्याने वारुळातील सदस्यांत संदेशवहन असणे आवश्यक असते. वारुळाची उभारणी, अन्नाचा शोध, धोक्याचा इशारा, संरक्षण इत्यादींची देवाणघेवाण सतत होत असते. डोळे असलेल्या वाळवींमध्ये डोळे, तर अंध असलेल्या सदस्यात रासायनिक द्रव्ये व स्पर्शाद्वारे संदेशवहन होते. अन्न मिळविण्यासाठी कामकरी वाळवी वारुळाबाहेर येतात. त्यांची जमिनीवर रांग लागते. वाळवी रासायनिक द्रव्य जमिनीवर सोडते, त्याच्या गंधाद्वारे अन्नाची दिशा इतरांना कळते. धोक्याची सूचना इतरांना धडका मारून दिली जाते.

वसाहती : वाळवीच्या नवीन वसाहतीची स्थापना पंखधारी प्रौढ वाळवीकडून होते. पंखधारी प्रौढ नर-मादी (राजा-राणी) वारुळातील त्यांच्या कोठडीत काही काळ एकत्र राहतात आणि पावसाळ्याच्या सुरुवातीस योग्य वातावरणात बाहेर पडतात. याच सुमाराला कामकरी वाळवी त्यांना वारुळातून बाहेर पडण्यासाठी बोगदे, मार्गिका व वारुळाच्या बाहेरच्या भागावर छिद्रे तयार करतात. सैनिक वाळवी छिद्रांच्या आसपास पहारा देतात आणि शत्रूला वारुळात प्रवेश करू देत नाहीत. एका क्षणी छिद्रातून वाळवीची नर-मादी बाहेर झेप घेतात. त्याला 'मीलन-उड्डाण' म्हणतात. नर-मादी जमिनीवर उतरतात तेव्हा त्यांचे पंख गळून पडतात. ही जोडी नवीन वारूळ करण्यासाठी एखादी भेग, लाकूड अथवा भुसभुशीत जमीन शोधून काढते. जमिनीला छिद्र पाडून एक कोठडी तयार केली जाते. कोठडीचे छिद्र विष्ठेने बंद केल्यावर नर-मादीचे प्रथम मीलन होते. गरजेनुसार अधूनमधून त्यांचे मीलन होतच असते. यात नराच्या शुक्रपेशी मादीच्या शुक्रपेशी-ग्राहिकेत साठविल्या जातात. त्यानंतर मादी अंडी घालते. अंड्यांची संख्या कमी,

म्हणजेच काही शेकड्यांत असते. अंड्यातून जन्मलेल्या पिलांपासून कामकरी वाळवी व सैनिक वाळवी तयार होतात आणि पुन्हा वसाहत तयार होऊ लागते. २-५ वर्षांच्या कालावधीत राणीची अंडी घालण्याची क्षमता वाढत जाते. वाळवीची राणी प्रतिसेकंदास एक याप्रमाणे दररोज हजारो अंडी घालते. या कालावधीत काही महिने राजा-राणी पिलांचे संगोपन करतात. वसाहत जशी मोठी होत जाते तसे कामकरी वाळवी वारुळातील कामे करतात. काही जातींतील वाळवीच्या वसाहती शंभर ते हजार सदस्यांच्या असतात, तर काही जातींमध्ये लाखो ते कोटी सदस्य असतात. ही सर्व निर्मिती वाळवीच्या एका प्रजननक्षम नर-मादी जोडीपासून होते. या जोडीला प्राथमिक प्रजननक्षम जोडी म्हणतात. काही वर्षांनंतर द्वितीय प्रजननक्षम जोडी तयार होते. ती जोडी वारुळाबाहेर पडून नवीन वसाहत निर्माण करते. कामकरी, सैनिक, तसेच प्रजननक्षम वाळवी निर्माण करणे हे परिस्थितीनुसार आणि वाळवीमधील सामाजिक वर्तन, पोषक घटक, संप्रेरके आणि रासायनिक घटक यांनुसार ठरते.

वाळवीमध्ये अर्धरूपांतरण व अपूर्ण जीवनचक्र असून त्यांच्या वाढीचे अंडे, कुमारावस्था व प्रौढावस्था असे टप्पे असतात.

मुंग्या, भुंगे, चतुर, बेडूक, सरडे, पक्षी, उंदीर, मुंगीखाऊ हे वाळवीचे शत्रू आहेत. वाळवी लाकूड खाऊन, कुरतडून, छिद्रे पाडून लाकडाचे नुकसान करते. त्यामुळे इमारतीचे लाकूड, जमिनीत पुरलेले लाकडी खांब, लाकडी पूल, ओंडके, पाणी अडविण्यासाठी वापरलेल्या फळ्या (बरगे), रेल्वेचे लाकडी पाट, फर्निचर यांचे नुकसान होते. पुस्तके, वह्या, सुती कपडे, टोपल्या, गालिचे यांचे; तसेच शेते, मळे, वने यांतील वनस्पतींचे ते नुकसान करतात. काही प्रमाणात वाळवी मानवाला उपयुक्त असते. तिचा उपयोग औषधे तयार करण्यासाठी होतो. तसेच वाळवी लागलेल्या जमिनीत हवा खेळती राहिल्यामुळे जमिनीचा कस वाढतो. वारुळाची माती जोरखत म्हणून वापरतात. तसेच, रत्नांना पॉलिश करण्यासाठी, टेनिसचे क्रीडांगण, जमीन तयार करण्यासाठीही वारुळाची माती वापरतात.

नियंत्रण : वाळवीचे नियंत्रण अनेक प्रकारे करतात. वाळवी लागू नये यासाठी बांधकाम करण्यापूर्वी, तसेच नंतर जमिनीत कीटकनाशके ओततात. लाकडी बांधकामालगत अरुंद चर खणून त्यात कीटकनाशके भरतात. त्यामुळे लाकूड कुजत नाही. लाकडाला छिद्रे पाडून वाळवीनाशक रसायने भरतात. शेतात कडुनिंबाची, करंजीची पेंड टाकतात. नांगरणी करून वाळवीनाशके टाकतात. क्रिओसोट, मर्क्युरिक क्लोराइड, झिंक क्लोराइड, सोडियम फ्ल्युओरोसिलिकेट, लिंडेन, डायएल्ड्रीन, सोडियम आर्सेनेट, ट्रायक्लोरोबेंझीन, मॅलॅथिऑन, पायरेथ्रम, टॉक्झोफेन आदी वाळवीनाशके आहेत. ती धुरळणी, भुकटी, पाण्यात विरघळवून, फवारे या प्रकारे वापरतात. मेथोप्रीन हे रसायन वाळवीमध्ये असलेल्या आदिजीवांना नष्ट करते. त्यामुळे वाळवीच्या पिलांना ओकारीचे अन्न मिळत नाही. अशा परिस्थितीत अन्न न मिळाल्याने वाळवीची पिले मेल्याने वाळवीच्या वाढीवर नियंत्रण येते.

वाळवींतील संदेशवहन, वाळवी आपल्या मार्गावर सोडत असलेल्या गंधाद्वारे होत असल्याने, तीव्र गंधाचे इतर पदार्थ जसे की रंग, डांबर इत्यादींच्या वापराने वाळवीच्या प्रसारास प्रतिबंध होतो. ओल नियंत्रित करता आली तर वाळवीचा प्रसार कमी होतो. वस्तू हालत्या ठेवल्यास वाळवीला वारुळे करण्याची संधी न मिळून त्यांचा प्रसार कमी होतो.

पूर्वी पुणे जिल्ह्यात ढेकूण झालेली लाकडी घरे ढेकूणमुक्त करणे अत्यंत अवघड असे. ती पेटवून जाळूनच नष्ट करावीत असे लोक मानत असत. तसाच प्रकार

(पृष्ठ क्र. १० वर)

# ‘समग्र’ टिळक : एक स्मरण

*दिनांक १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांचा स्मृती दिवस. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा ज्येष्ठ लेखक व कवी डॉ. आशुतोष जावडेकर यांचा लेख : संपादक*

दि. १ ऑगस्टला – लोकमान्य टिळकांनी मुंबईच्या सरदारगृहात शेवटचा श्वास घेतला. ते जिवंत होते तेव्हा देखील त्यांनी स्वतःच्या श्वासावर स्वतःची मर्जी अशी ठेवली नव्हतीच. तो श्वास, तो ध्यास – संपूर्ण स्वातंत्र्य – ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून कायमची सुटका – या एकमेव कारणासाठी राखून ठेवला गेला होता. मग घरची मंडळी नकळत दूर गेली, आगरकरांसारखा जवळचा दोस्त बघता बघता जणू शत्रू झाला, मवाळांशी नुसतं भांडण झालं नाही; तर प्रचंड संघर्ष तहयात झाला. स्नेही दुखावले, कधी जवळची माणसे दुटप्पीपणाचा आळ आणत राहिली. टिळकांच्या ‘आतला’ जो प्रज्ञावंत विचारवंत होता त्यालाही जगायला फार फुरसत त्या ध्यासाने ठेवली नव्हती. त्या आतल्या श्वासाला अधेमधे वाईट वाटलं असणारच या सगळ्याचं! आगरकर गेल्यावर केसरीत अग्रलेख लिहिताना टिळकांचे डोळे अखंड भरून येत होते ते अन्यथा घडते ना! त्या श्वासाने टिळकांमधल्या तत्त्वज्ञाला पुस्तक लिहायला मुभा दिली ते थेट मंडालेच्या तुरुंगात! अर्थात, असह्य उकाड्यात गीतारहस्य लिहिताना तो स्वातंत्र्य-ध्यास पक्का होता. ब्रिटिशांनी ज्या हुशारीने, सक्तीने, दडपशाहीने सत्ता काबीज केली होती ती ती सारी आयुधे वापरून टिळकांना सत्ता पुन्हा एत्तद्देशीयांकडे लवकर आणायची होती. त्यात नीती आणि अनीती सापेक्ष होती. (गीतारहस्य खरे तर तेच होते!)

चाफेकर बंधूनी रँडचा वध केल्यावर ब्रिटिश खवळले होते. पुण्यातल्या सगळ्या ब्राह्मणांनी मिळून – जहाल आणि मवाळ – हे घडवून आणले आहे असे ब्रिटिशांचे मत झालेले. कुणी सांगावे, तसे असेलही! True history is always very complex. नंतर माफी मागितली तरी मुळात नामदार गोखले हे रँड कसा जुलुमी होता याची साक्ष तेव्हा ब्रिटनमध्ये पत्रकारांसमोर आणि नागरिकांसमोर उच्चरवात देत होते. ब्रिटिशांनी ‘पुण्याचे ब्राह्मण’ असं सहज म्हटलं कारण तेव्हाही राजकारण होतं; पण जातींची गणिते थेट खुली होती. आजच्याइतकी वरकरणी पुरोगामी बुरखा पांघरलेली चतुर जातीयता तर तेव्हा नक्कीच नव्हती.

आणि हो, यावरून : टिळक सगळ्यांचे होते. त्यांचा जगण्याचा बिंदू हा स्वाभाविकपणे मराठी- ब्राह्मणी घटितात झाला, तरी ती नदी पुढे किती वाढत गेली हे बघण्यासारखं आहे. आजही पंजाबी माणसाने गच्च मिठी मारली की मराठी माणूस नकळत मागे सरकतो. त्या काळात पंजाब ते बंगाल, काश्मीर ते केरळ असे सगळे प्रांत टिळकांना आपले मानत होते आणि टिळक त्यांना एका माळेत ओवीत आयुष्यात फार पुढे निघून गेले होते. त्यांचे अनुयायी भले नारायण पेठेतल्या गायकवाड वाड्यात मनाने असतील, टिळक नावाचा पक्षी सगळ्या धर्मांना, जातींना सोबत घेऊन देशभर स्वातंत्र्याची ऊर्मी मनात घेऊन ब्रिटिशांना धडकत होता. बाकी देशाने टिळकांचे स्मरण अद्याप बरेच ठेवले आहे. महाराष्ट्रात आता टिळकांचं कौतुक करायची देखील जशी घाबरट विचारवंतांना लाज वाटते तसा प्रकार सुदैवाने देशभर नाही. माझ्या उत्तर भारतीय मित्रांना, प्राध्यापक स्नेही मंडळींना ‘ळ’ अक्षर म्हणता येत नसेल; पण त्यांनी ‘तिलक महाराज’ आदराने स्मृतीत ठेवले आहेत.

बाकी कुठल्या नेत्याला मर्यादा नसतात? इतके मोठे राजकीय स्टेक खेळताना सगळ्या नेत्यांच्या चुका – कधी तर घोडचुका होतात. नेत्याचं संचित हे लांब जाऊन दुरून समग्र चित्र बघत करायचं असतं. छोट्या भिंगातून झूम करत रील बघण्याचा सध्याचा काळ आहे. आजच्या अनेक माणसांना टिळक कळणारच नाहीत! रत्नागिरीचा जन्म, मुंबईमधील मृत्यू, पुण्यातील शिक्षण आणि प्रारंभिक राजकारण, मधल्या आयुष्यात आपलासा केलेला (तेव्हाचा अविभक्त) भारत देश आणि अनेक दीर्घ तुरुंगवास – टिळकांच्या आयुष्याचा हा विशाल भावपाट, विचारपट त्यांना कसा कळावा !

टिळक मला आधी भेटले ते गंगाधर गाडगीळ यांच्या 'दुर्दम्य' या कादंबरीमुळे. पुढे सगळ्या बाजूने वाचन झालं. टिळक थोडे थोडे कळत गेले. आगरकर जास्त कळले, भावले. त्यांचं आणि टिळकांचं मैत्री नाट्य इतकं मला भिडलं की; मी 'दोघे' नावाचं गाणं लिहिलं, गायलं, 'सकाळ' माध्यम समूहाने ते प्रसिद्ध केलं – यालाही आता काळ उलटला. वय वाढलं तसे आता टिळक अधिक कळतात! नीतीच्या मर्यादा आणि नीतीमधील फटी अधिक समजतात. त्यांनी एकीकडे चाफेकर, सावरकर आणि एकूण अतिजहाल मंडळींना वाऱ्यावर सोडलं नाही आणि दुसरीकडे मवाळांना त्यांचा कंटाळा आला तरी त्यांच्याशीही टिळक नकळत सांधून घेत राहिले. 'इन टोटो' चित्र काढताना जवळचा रंग जसा कधी विस्कटतो, तसं टिळकांचं जगणं होतं. यातला अन्याय पटला नाही तरी आता मला त्याची अपरिहार्यता कळते. आणि मग या नव्या नजरेने टिळकांनी मांडलेला भव्य राजकीय पट घेऊन समोर बसलं की, आदराने मान लवते, नकळत नमस्कार केला जातो!..

**डॉ. आशुतोष जावडेकर**
ज्येष्ठ लेखक
पुणे

(पृष्ठ क्र. ८ वरून – **वाळवी**)

वाळवी हा आहे. मात्र तो पुणे जिल्ह्यापुरता सीमित नसून जागतिक आहे. २५ ते ५० वर्षांपूर्वी तयार झालेल्या जुन्या इमारतीतील जुनी लाकडे, ओल असलेल्या लाकडी वस्तू, वर्षानुवर्षे न हललेले लाकडी सामान इत्यादी नष्ट करण्यासच वाळवीचा जन्म झालेला आहे.

पेस्ट कंट्रोल केल्याने घरे वाळवीमुक्त होतात असा समज आहे. मात्र खात्रीपूर्वक तसे होताना दिसत नाही. पेस्ट कंट्रोलही वर्षातून नियमीतपणे करतच रहावा लागतो. त्याउपरही कुणी हमी देत नाही. पूर्वीच्या काळातील सागवान लाकडाने बांधलेली घरे, वाडे, लाकडी सामान अनेक वर्षे, दशके, शतके वाळवीमुक्त कसे राहात असे, हे त्यांची निर्मिती करणारेच जाणत असतील. हल्लीच्या बांधकाम व्यावसायिकांना मात्र वाळवीवर निस्संदिग्ध विजय मिळवता आलेला नाही हेच निखळ सत्य आहे. वाळवी-प्रतिबंध हा त्यांच्याकरता संशोधनाचा विषयही आहे आणि वाळवीपीडितांना वाळवीनिर्मूलनाचा मार्ग दाखवू शकले तर उभयतांच्या समृद्धीचा महामार्गही नक्कीच आहे!

**संदर्भः**

१. मराठी विश्वकोशातील वाळवीची माहिती
https://marathivishwakosh.org/55392/

२. विकिपेडियावरील वाळवीची माहिती
https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B5%E0%-4%BE%E0%-4%B3%E0%-4%B5%E0%-5%80

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

शहाणपणाचा दुष्काळ हेच दुनियेत दु:खाचा दोष लपवला की तो मोठा होतो
आणि कबूल केला की नाहीसा होतो.

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले रायगड

*महाराष्ट्राच्या पराक्रमाचे प्रतीक, मराठ्यांच्या शौर्याचा साक्षीदार आणि शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडाचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करण्यात आला आहे. त्याचीच माहिती आपण या लेखात पाहणार आहोत. – संपादक*



**रायरीचा डोंगर**

माता जिजाऊ आणि शिवबांना बंगलोरला येऊन उणीपुरी दीड वर्षे झाली होती. आता पुण्याचा परतीचा प्रवास सुरू होणार होता. निघण्याच्या एक दिवस आधी शहाजीराजेंच्या सदरेवर मोजकीच खाशी माणसे बसली होती. त्यात बाळकृष्णपंत, नारोपंत या नेहमीच्या कारभाऱ्यांसमवेतच संभाजीराजे, कान्हेरी जेधे, माणकोजी दहातोंडे, म्हाळोजी घोरपडे असे लढवय्येसुद्धा सामील होते. दादोजी आणि शिवाजीराजेसुद्धा हजर होते. किंबहुना त्यांच्यासाठीच ही बैठक होती. वेळेची नजाकत ओळखून जिजाऊसाहेबांना बोलावणे धाडण्यात आले. त्या येताच सर्व जण उभे होत मानवंदना देऊ लागले. शहाजीराजांच्या बाजूलाच असलेल्या बैठकीवर स्थानापन्न होताच, शहाजीराजांनी शिवबांना एक कागद दिला आणि ते म्हणाले ''नमस्कार, राजे, या कागदावर काय लिहिले ते मोठ्याने वाचा.'' शिवबाराजांनी कागदावर पाहिले तो त्यावर एक अष्टकोनी मुद्रा उठवलेली होती. शिवबा वाचू लागले, 'प्रतिपच्चंद्र लेखेवर्धिष्णु विश्ववंदिता! बाहसूनो: शिवस्थैया मुद्रा भद्राय राजते!!'

हे ऐकताच सर्वांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे 'वाहवा' बाहेर पडली. जे संस्कृतचे जाणकार नव्हते त्यांची समस्या ओळखून शहाजीराजे म्हणाले, ''शिवबाराजे, ही तुमची मुद्रा. हिचा अर्थ तुम्हीच समजावून सांगा.'' शिवबाराजे सांगू लागले, ''प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढत जाणाऱ्या शहाजीपुत्र शिवाजीची ही मुद्रा भली राहो ! राजांनी ती मुद्रा शिवबाराजेंकडे सोपवत सांगितले, शिवबाराजे, प्रतिपदेचा चंद्र लक्षात घेतांना हे लक्षात ठेवा की, प्रतिपदेचा आदला दिवस अमावस्येचा म्हणजे पूर्ण अंधाराचा असतो. या अंधाराला हटवत तुम्हाला चंद्राप्रमाणे कलेकलेने आपले राज्य वाढवायचे आहे व तुमचे राज्य पूर्णचंद्र झालेले आम्हास पाहायचे आहे.''

जिजाऊंना राहावले नाही. त्या उद्गारल्या, 'महाराज, मुद्रेवरचे कवित्व आपलेच ना ! केवढे मोठे दुर्घट कार्य आपण शिवबासमोर उभे करीत आहात!' त्यावर राजे म्हणाले, ''महाराणी, त्या मुद्रेवर शब्द आमचे आहेत, पण स्वप्न आपलेच आहे. स्वत: राजा बनणे आम्हाला जमले नाही. दुसऱ्या प्रयत्नाला आम्हाला फार जाणवले की, कुणी आम्हासारखाच पाठी मजबूतपणे उभा राहावा, पण आमच्या नशिबी ते नव्हते. पण आता मात्र आम्ही सह्याद्रीत शिवाजीराजांच्या पाठी ठामपणे उभे राहू. नव्हे, आहोतच. शिवबांना सांगा..! साम, दाम, दंड, भेद.. वाटेल ती नीती वापरा ..दाम तेव्हढाच नको..दंड द्या, भेद करा आणि कार्यरत व्हा. सर्व वतनदारांना एक करा. अडचण आली तर आम्ही आहोतच.'' जिजाऊ

मान हलवत म्हणाल्या, ''ते सारे हो, पण..'' शहाजीराजे म्हणाले, ''पण काय? आम्हाला राजे होणं जमले नाही तरी राजपिता होऊच. पुढचे पुढे बघू!'' कांही क्षणात स्वत:ला सावरत राजे बोलले, ''शिवबाराजे, तुमचे मंत्रिमंडळही आम्ही तयार केले आहे. यात राजश्री शामराज नीळकंठ रांझेकर हे पेशवे असतील. शिवबा, आम्हाला 'पेशवा' नाही, पण तुम्हाला देत आहोत. हे राजे सोनोपंत विश्वनाथ. हे 'डबीर' म्हणून आपल्यासोबत येत आहेत. हे राजश्री रघुनाथपंत बल्लाळ अत्रे. 'सबणीस' म्हणून नियुक्त केले आहेत. हे राजश्री बाळाजी हरी 'मजालसी' तर हे नरहर बल्लाळ 'बक्षी' म्हणून तुमच्यासोबत येत आहेत आणि शिवबाराजे, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हे माणकोजीराव दहातोंडे तुमचे मुख्य सेनापती असतील. शिवाय, घोडदळाचे नेतृत्व निरखून बेग करतील. दादाजीपंत नेहमीप्रमाणे तुमचे मुख्य कारभारी आहेतच. राजे ही सारी मंडळी तुमच्यापेक्षा वयाने ज्येष्ठ आहे, तेंव्हा राजशिष्टाचाराचे नियम लागू होण्यापूर्वी या साऱ्यांना वंदन करून यांचे आशीर्वाद घ्या. फार मोठा धोका पत्करून व प्राप्तीत नुकसान करून स्वदेश, स्वधर्म यांच्या भक्तिपोटीच ही मंडळी तुमच्यासोबत आहेत.'' शिवबाराजे विनम्र भावाने साऱ्यांच्याच पाया पडले. सर्वांनी त्यांना मन:पूर्वक आशीर्वाद दिले. राजांनी याच आनंदात शिवाजीराजांच्या हाती भगवा ध्वज सोपवला आणि म्हणाले, ''आता याला उंच फडकवत ठेवणे हे तुमचे काम आहे. बोला! हर हर महादेव!'' सारेजण त्या महादेवाच्या गजरात सामील झाले आणि ती अतिमहत्त्वाची बैठक पार पडली.

शिवबा पुण्यास परतले, जहागिरीचा कामात दादोजींच्या देखरेखीत गुंतले, फडाच्या कारभारात माता जिजाऊंच्या सहाय्याने लक्ष देऊ लागले. रांझ्याच्या पाटलास त्याच्या गैरवर्तनाबद्दल शिक्षा म्हणून त्याचे हात-पाय तोडले. जहागिरीत यामुळे जरब बसली. सगळी स्थिरस्थावर झाल्यावर शहाजीराजेंच्या स्वप्नपूर्ततेकडे त्यांनी वाटचाल सुरू केली. मूठभर मावळ्यांच्या साथीने रोहिडेश्वर (१६४५) आणि तोरणा (१६४६) या दुर्लक्षित गडांवर ताबा मिळवला. चाकण आणि कोंडाणा (१६४७) मनभेदातून, तर पुरंदर भेद आणि दंडातून (१६४८) काबीज केलेत. त्यामुळे विजापूरचा आदिलशहा खवळला. त्याने शिवाजींना धडा शिकवण्यासाठी सरदार फत्तेखानास पाठवले. मात्र राजांनी मूठभर मावळ्यांच्या साथीने शिरवळ आणि सुभानमंगल खोऱ्यात त्याचा सपशेल पराभव करत पिटाळून लावले (नोव्हेंबर १६४८). पुढे जावळीतील दौलतराव मोठ्यांच्या मृत्यूनंतर (१६४८) यशवंतराव मोर्यांची वारस म्हणून त्या प्रांतावर वर्णी लावून तो प्रदेश भविष्यात स्वराज्याच्या हिताचा होईल अशी योजना केली. दोन-तीन वर्षे आनंदात गेली. परंतु नंतर यशवंतरावाने पलटी खात मुजोरी सुरू करून आदीलशाहीशी जवळीक साधणे सुरू केले. तेव्हा जावळीवर सैन्य पाठवून ती ताब्यात घेतली. यशवंतराव रायरीच्या डोंगरावर पळून गेला. रायरीच्या आश्रयाला गेलेल्या यशवंतरावाशी लढाई करणे तितके सायीचे ठरणारं नव्हते म्हणून १६५६ च्या फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात शिवरायांनी जावळीतच काढून त्याची घडी मनाजोगती बसवून घेतली. त्यानंतर राजांनी जावळी सोडत ससैन्य रायरीस वेढा घातला. लवकरच हैबतराव सिलीमकर आणि कृष्णाजी बाबाजी यांच्या मध्यस्थीने यशवंतरावांना गडाखाली आणण्यात यश मिळाले. तह झाला. रक्तपात न होता रायरीचा कब्जा शिवाजीराजांना मिळाला. तो दिवस होता वैशाख वद्य सप्तमी, शके १५७५ म्हणजे ६ एप्रिल १६५६. यशवंतराव, त्यांची मुले कृष्णाजी व बाजी यांची राजांच्या गोटात इतमानाने राहण्याची व्यवस्था करण्यात आली.

राजांनी लगोलग रायरीचा परिसर पिंजून काढला. डोंगर चढतांना वाघोली आणि वाळसूर्याच्या अंगास असा दोन बाजूंनी रायरी दोन ठेंगण्या रांगांशी जुळलेला दिसला. तेवढा भाग वगळता शेष भाग मुश्किल असल्याचे त्यांनी हेरले. मढ्याघाट, शेवत्याघाट शिंगापूरची नळी, बोतेशिवाचा घाट, कावल्या-बावल्याची खिंड या वाटांच्या तळांचा तो संरक्षक होता. समुद्र तर फार लांब नव्हताच. दीड गांव उंच (अडीच हजार फूट), चहू बाजूंनी तासलेल्या कडांचा तो डोंगर व त्यावरचा भव्य पठार त्यांना भावला. त्यावेळी व्याडेश्वराचे प्राचीन मंदिर अणि दोन-तीन चौकीवजा घरांखेरीज तेथे काहीच नव्हते. शिवबांनी मनोमन कांही आराखडे बांधले आणि इमारत अभियंता हिरोजी इंदुलकरांना ते समजावून सांगत त्या दृष्टीने रायरी मजबूत करण्यास सांगितले. या कामावर मोरोपंतांना देखरेखीसाठी नेमले आणि मोरे कुटूंबासह राजे पुण्यास परतले. रायरी हळूहळू पण निश्चयाने आकार घेऊ लागला.

एव्हांना माता जिजाऊसाहेब व शिवबांना बंगलोरहून पुण्यास यायच्या घटनेला वीस वर्षे झाली होती. तोच शिवबांनी राजगडी बातमी दिली, खासे शहाजीराजे बंगलोरहून आदिलशहाची पैगाम घेऊन स्वराज्यात दाखल होत आहेत. गडावर आनंदी-आनंद पसरला. तेंव्हाच्या प्रथेनुसार जेजूरीला खंडोबारायांच्या मंदिरात भोसले कुटूंबीयांची पहिली भेट झाली. राजगड मुक्कामी शहाजीराजांनी शिवबांनी आदिलशाहीतील जिंकलेल्या किल्ल्यांना विजापूर दरबाराची मान्यता असल्याचे व आग्रा दरबारातून होऊ घातलेल्या आक्रमणास एकत्र समोर जाण्याचे मनोगत शिवबांना कथन केले. लगेच नव्याने बांधण्यात येणाऱ्या रायरीच्या गडाची महिति घेतली. भविष्यात तिथेच हिंदवी स्वराज्याच्या राजधानीची स्थापना करण्यास सांगत त्याच दृष्टीकोनातून कांही महत्त्वाची कामे करण्यास व गडाचे नामकरण रायगड करण्यास सांगितले. त्याबरहुकूम शिवबाराजे लगोलग रायगडावर दाखल होत इंदूलकरांना सरदार, हजारात, ब्राह्मणवर्ग यांची निवासस्थानांची व्यवस्था आणि पाण्यासाठी आणखी जागा शोधण्यासाठी सांगितले.

काळ पुढे सरकत होता. शिवबा जमेल तसे रायगडी भेट देत होते. सप्टेंबर १६७० चा महिना उजाडला. गडाचे काम पूर्णत्वाला आले होते. सवड काढून शिवबाराजे रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाडला आले. माँसाहेबांचा भक्कम तटबंदीत वसलेला तो दो चौकी वाडा बघून समाधान व्यक्त केले. पुढे राजे पायीच सहकाऱ्यांसह रायगड चढू लागले. एका बाजूस ताशीव तुटलेले कडे आणि दुसऱ्या बाजूला आकाशात चढलेली दरड आणि त्यातून जाणारी चिंचोळी वाट राजांच्या मनाला सुखावित होती. राजे गंगासागरावर आले. निर्मळ पाण्याने भरलेला तो गंगासागर बालेकिल्ल्याचे प्रतिबिंब उरात साठवून पसरला होता. त्यांची नजर लागलीच गंगासागराच्या काठावर आणि बालेकिल्ल्याच्या तटाला लागून उभा असलेल्या द्वादशकोनी व पाच मजली उंच दोन मनोऱ्यांवर खिळली. सोनारशाळा, दफ्तरखाना, शस्त्रशाळा, अंधारकोठडी, टांकसाळ, अंबरखाना, खलबत्तखाना, राण्यांचे महाल, राजमहाल व मागचा मेणा दरवाजापर्यंतचा भाग डोळ्यांखाली घालत राजे राजसदरेवर आले. समोर उंच नगारखाना दिसत होता. मध्यभागी विस्तृत चौक होता. भव्य बाजारपेठ, पिलखाना, दारुकोठार, जगदीश्वर मंदिर, पागा, कारभाऱ्यांसमवेतच वास्तू पाहून झाल्या. चार दिवस राजे गडावर होते. राजांनी इंदूलकरांना वाघ दरवाजावर आणखी एक दारुकोठार उभारण्यास सांगितले. आता रायरीचा डोंगर रायगड आणि व्याडेश्वराचे मंदिर जगदीश्वर मंदिर झाले.

---

वाया घालवलेला वेळ आपलं भविष्य बिघडवत असतो.



**रायगडचा बालेकिल्ला**

डिसेंबर १६७० पासून हळूहळू राजगड या जुन्या राजधानीतून रायगड या नव्या राजधानीच्या ठिकाणी स्थलांतर होऊ लागले. गडावरील उरलीसुरली कामे पटापट उरकू लागली. पागेचे व ४६ पहाऱ्यांच्या चौथऱ्यांची कामे पूर्ण झाली. पैकी १८ चौथरा बालेकिल्ल्याभोवती आणी इतर महाद्वार ते टकमक टोकापर्यंत एकमेकांच्या नजरेच्या टप्प्यात बसतील असे उठवण्यात आले होते. त्यावर फिरती जागल सुरू झाली. एका चौकीवरून रात्री पहारेकऱ्यांना हाती चुडीत घेऊन दुसऱ्या चौकीपर्यंत जागल पोहोचावी लागे. अगदी कोसळत्या पावसातही हे करावे लागे. गडाच्या रक्षणार्थ ४७ तोफा विविध ठिकाणी तैनात करण्यात आल्या. शेवटी ६ जून १६७४ हा राजांच्या राज्याभिषेकाचा दिवस उगवला (ज्येष्ठ शुद्ध तृतीया). इतर सोपस्कार पार पडल्यानंतर संध्याकाळी राज्याभिषेक विधीस प्रारंभ झाला. मध्यरात्रीनंतर अभिषेक संपन्न झाला आणि राजे सिंहासन रोहणासाठी राज्यसभेकडे चालू लागले. भालदारांच्या आरोळ्या उठल्या, 'प्रौढप्रतापपुरंदर, छत्रसिंहासनाधिश्वर, गो-ब्राह्मणप्रतिपालक, क्षत्रियकुलावंतस, महाराजा छत्रपती.' एका खांद्यावर धनुष्य, पाठीस भाता, उजव्या हातात विष्णुमूर्ती असा जाणता राजा धीरगंभीरपणे एकेक पाऊल टाकीत आपले सगळे इहलोकी नसलेले, स्वराज्यासाठी प्राण त्यागलेले सवंगडी आठवीत सिंहासनाच्या पायऱ्या चढून गेला आणि नम्र भावनेने त्यास पाय न लावता विरासन घालून त्यावर आरूढ झाला. त्या क्षणी तोफा दणाणल्या. गागाभट्टांनी छत्रपतींची बिरुदे म्हणून त्यांच्या मस्तकावर छत्र धरताच शिंगे, कर्णे, दमामे, नगारे, चौघडे, सूर आणि उपस्थितांच्या तोंडून निघणारा जयध्वनी असा एकच घोष उसळला हिंदवी स्वराज्याला त्या दिवशी रायगडावर स्वत:ची अशी नवी ओळख निर्माण झाली. शहाजीराजांनी पाहिलेले स्वतंत्र हिंदवी राज्याचे स्वप्न त्यांच्या शिवबाने पूर्णत्वास नेले होते. माता जिजाऊंची स्वप्नपूर्ती झाली होती आणि भरल्या, निश्चिंत मनाने राज्याभिषेकाच्या अकराव्या दिवशी म्हणजे दिनांक १७ जून १६७४ ला त्यांनी इहलोक सोडला.

शिवबाराजे राज्यरोहणानंतर स्वस्थ बसले नाहीत. १० डिसेंबर १६७४ ला मुघलांच्या खानदेशावर स्वारी करून मोठी लूट मिळवली, १७ एप्रिल १६७५ ला फोंडा जिंकून घेतला, तर २१ मे १६७५ ला कारवारचा मोठा भाग ताब्यात घेतला. पुढे १६७६ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर कर्नाटक स्वारीसाठी प्रयाण केले. तेंव्हाचा कर्नाटक म्हणजे सध्याचा तमिळनाडू, केरळ व कर्नाटक एवढा प्रदेश. तो जिंकून जून १६७८ मध्ये राजे रायगडी परत आले. त्यानंतरही उसंत न घेता खांदेरीची पूर्ण झालेली तटबंदी बघून इंग्रजांशी तह केला. मात्र, त्यानंतर लगेच लहानशा शारीरिक व्याधीने त्यांचे देहावसान रायगडी झाले. राजांची अंतेष्टी साबाजी भोसल्यांनी केली. त्यांचेच कूळ म्हणजे नागपूरचे भोसले. शिवबांच्या मृत्यूनंतर संभाजींची ७-८ वर्षांची कारकीर्द अतिशय धावपळीत गेली. त्यांच्या मृत्यूनंतर मोगल सरदार इतिकतखानाने रायगडास वेढा दिला आणि तो जिंकूनही घेतला. तिथून रायगडाच्या लुटीची सुरुवात झाली आणि ती १८१८ पर्यंत सुरू होती. इंग्रजांनी १८१८ च्या मे महिन्याच्या प्रारंभीच पोटल्याच्या डोंगरावरून गडावर

तोफांचा भडिमार सुरू केला. किल्ला जळत होता. या आगीत सर्वच भस्मसात होऊन मुख्य इमारतींचे चौथरे तेव्हढेच शिल्लक उरले. शेवटी १० मे १८१८ ला इंग्रज व किल्लेदार शेख अबूद यांच्यात तह होऊन रायगड इंग्रजांच्या स्वाधीन करण्यात आला. त्याच दुपारी कर्नल प्राथर किल्ला चढून गेला आणि गडावरची ५ लाखांची लूट घेऊन खाली उतरला.

पुढे १८९५-९६ साली इंग्रज अधिकारी सिनक्लेयरने रायगडास भेट देऊन शिवबाराजांच्या समाधीची तात्पुरती दुरुस्ती केली व देखभालीचा खर्च म्हणून शासनाकडून ५ रुपये महिना अशी मंजूरी मिळवून घेतली. हा होता समाधीच्या जिर्णोद्धाराचा प्रारंभ. त्याची चळवळ सुरू झाली. लोकमान्यांनी त्यात लक्ष घातलं. कंत्राट निघालं. पण कुणीच ते घ्यायला पुढं येत नव्हतं. कारण रायगड म्हणजे दुर्गम स्थान. सिमेंट, अन्नधान्य सगळे डोक्यावर वाहून न्यायचे. शेवटी १९२४ साली सुळे नामक इंजिनीयरने शिवप्रेमाने प्रेरित होऊन ते कंत्राट घेतलं. कामास सुरुवात झाली. दोन-तीन फूट खोदल्यानंतर एका दगडी शिळेखाली पेटीसारखे दगडी कुंड आढळले. त्यात होती 'स्वयं शिवप्रभूंची रक्षा'. त्या दगडी कुंडावरच मग मेघडंबरी बांधण्यात आली. आज आपण बघतो ती हिच समाधी.



**राजांची समाधी**

अशा या पवित्र स्थळी आम्हा दहावीच्या वर्गमित्रांचा सहकुटुंब भेट देण्याचा योग २०२२च्या जानेवारी महिन्यात आला. राणीवसा, राजमहाल, पालखी दरवाजा, गंगासागर, खलबतखाना, स्तंभ बघत सिंहासनासमोर आलो. शिवाजीराजांच्या राज्यारोहणाचे चित्र डोळ्यांसमोर नकळत आले. त्यावेळी आईसाहेब कुठे, सोयराबाई कुठे, संभाजी कुठे, गागाभट्ट कुठे, सरलष्कर कुठे, हेन्री ऑक्झेंडेन कुठे, नर्तिका कुठे हे मनोमन अनुभवीत त्या सिंहासनाला अभिवादन केले आणि नकळत सर्वांच्या ओठी शब्द उमटले, 'जय भवानी जय शिवाजी.'

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
वर्धा रोड, नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल– dilipwandalkargmail.com

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# उंटांची अद्भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून ‘उंट’ या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... – संपादक*

**‘‘अनेक उंट असलेल्या गावात माझे लग्न कर.’’ – जैसलमेरमधील एक म्हण.**

**२००६** – यात्रेच्यावेळी अनेक अस्वस्थ करणाऱ्या गोष्टींचा त्यांना सामना करावा लागला, ज्या गोष्टींनी थर वाळवंटाचा चेहरामोहराच बदलून टाकला होता. जिथे जिथे पाणी ट्युबवेलने मिळू लागले होते तिथे तिथे जमिनीचे, स्थानिक वृक्ष व वनस्पती, सर्व पर्यावरणाचे अतोनात नुकसान झाले होते. सरकार वाळवंटाच्या तथाकथित, ‘हरीतवाळवंटा’ साठी आवश्यक असलेल्या सर्व सामुग्रीवर अनुदान देत होते. वीज, पंपाने पाणी बाहेर काढण्यासाठी डिझेल, रसायने, खते व कीटकनाशके इ. भरपूर उत्पादन देणाऱ्या जातींना जोपासण्यासाठी भूगर्भातील पाण्याचा वापर काही काळासाठी फायद्याचा होता. काही ठिकाणी पाणी चोवीस तास उपसले जात होते व खेडूतांच्या जमिनीवर असलेली झाडे व झुडुपांच्या जागी, मुख्यत: मोहरी किंवा गव्हाचे एकाच प्रकारचे पीक मोठ्या प्रमाणांत घेण्यात येत होते. ही प्रगती अनेक जणांना, विशेषतः मंत्रालयांतील तंत्रज्ञ, जे विकास थोड्या काळांतील उत्पादनावर, तसेच शेतकरी किती खते व किटकनाशकांचा वापर त्यांच्या शेतात करतात यावर ठरवतात, त्यांना फायद्याची वाटत होती.

या अल्पकालीन मानसिकतेमुळे, एका ठिकाणची भूजल संसाधने साधारणपणे सहा–सात वर्षांनी पूर्ण झाली की शेतकरी – किंवा ट्यूबवेल भटके (असे त्यांना म्हणत) नवीन भागात स्थलांतरित होत व आणि दुसरी विहीर खोदत. ज्या जमिनींनी वर्षभर पशुंसाठी चारा पुरवला होता, मातीची धूप थांबली होती व जमिनीचे संरक्षण केले होते आता अशी झाडे, झुडुपे नसलेली जमीन, प्रत्येक वेळी नवीन जागी जातांना सोडून जात. त्यामुळे त्या जमिनी धुळीचे प्रदेश झाल्या.

इंदिरा गांधी कालवा त्यांच्या यात्रेच्या कार्यक्रमाचा भाग नव्हता, पण त्यांना अनेक वेळा सांगण्यात आले की, या कालव्याने मुख्य उंट प्रजनन क्षेत्रे नष्ट केली. १९९१ आणि १९९२ मध्ये त्यांच्या याआधीच्या सहली दरम्यान केलेल्या निरीक्षणाला यामुळे दुजोरा मिळाला. कालव्याजवळची गावे जी एकेकाळी राजस्थानमधील नाचणा आणि मोहनगड सारख्या सर्वोत्तम उंटांसाठी प्रसिद्ध होती, आता तेथे एकही उंट सापडत नव्हता. पंजाबमधील अनेक शेतकरी ज्यांचा उंटांशी कोणताही संबंध नव्हता व जे स्थानिक नव्हते अशांना जमिनी देण्यात आल्या. त्यांच्या शेतांसाठी, भीतीपोटी मुक्त उंटांना नुकसान करण्यापासून दूर ठेवण्यासाठी त्यांनी अनेक क्रूर पद्धती शोधून काढल्या. बंदुकीने गोळ्या घातल्या किंवा त्यांची तोंडे बंद करून किंवा काटेरी झुडपे त्यांच्या शेपटीला तारेने जोडून त्यांचा संथ आणि वेदनादायक मृत्यू आणला. त्यामुळे सतत वेदना होउन त्या उंटांना थोडाही आराम मिळत नसे.

विशेषतः बिकानेरच्या आसपासचे क्षेत्र सिंचन आणि बांधकामाच्या व्याप्तीमुळे न ओळखण्याजोगे बनले होते. तिला आठवले, फक्त पंधरा वर्षांपूर्वी तिला रेल्वे स्टेशनवरून तिच्या हॉटेलपर्यंत नेण्यासाठी घोड्याचा टांगा हे एकमेव वाहन होते. त्यावेळेस बहुतेक वाहतूक उंटांच्या गाड्यांमधून शांतपणे आणि कुठच्याही प्रकारचा अडथळा न येता होत होती.

आता शहराचे मुख्य रस्ते गर्दीने, धुराने व आवाजाने भरले होते. अधूनमधून जड ट्रकच्या वाहनांच्या गर्दीत गाडी ओढणाऱ्या उंटांची तिला दया आली.

यात्रेच्या दरम्यान त्यांनी जुने वाळवंट देखील अनुभवले होते, जिथे विकास पोहोचला नव्हता. तेथील लोकांना वाळवंटांत असलेल्या साधनसंपत्तीशी जुळवून घेऊन राहण्याची गरज होती. ते जुन्या तंत्राने पावसाचे वाहून जाणारे पाणी साठवत व वर्षभर टिकवत. ते फक्त पावसाळ्यातच पिकांची लागवड करत व उंट, गुरेढोरे, मेंढ्या आणि शेळ्या इ. पशुधनावर अवलंबून राहात व सिंचनाचा उपयोग करत. कणखर वनस्पतींचे स्वादिष्ट अन्नात रुपांतर करत ते पूर्णपणे अनोळखी होते तरी अनेक कुटुंबांनी त्यांचे सौजन्याने स्वागत केले. त्यांनी त्यांना, तहानेवर उत्तम उपाय असलेले जिऱ्याच्या चवीचे अनेक ग्लासेस थंड ताक व ताजा भाजलेला सोगरा (बाजरीची भाकरी) व मोकळ्या ठेवलेल्या गायींचे तूप आणि खेजरीच्या झाडाच्या शेंगांपासून बनवलेली भाजी असे जेवण दिले. त्यांनी इल्सला (ती एक स्त्री असल्यामुळे) मातीच्या विटांनी बनवलेल्या त्यांच्या प्रेमाने सुशोभित केलेल्या घरांचे आतील भाग दाखवले. त्याची देखरेख महिलांनी गोबरचे (शेणाचे) थर देऊन अतिशय मेहनतीने केली होती. कथा, विनोद आणि कधी संगीताने त्यांनी त्यांचे मनोरंजन केले. या लोकांचे जीवन नक्कीच कठीण होते, परंतु त्यांनी ते भासवले नाही. ते आदरातिथ्यशील, विनोदी आणि उदार होते. किंबहुना, भौतिक दृष्टीने नाही पण पारमार्थिक दृष्टीने तिने त्यांना प्रचंड श्रीमंत म्हटले.

नोव्हेंबर २००४ मध्ये त्यांच्या कार्यशाळेदरम्यान, जैसलमेरमधील उंट पाळणाऱ्यांनी त्यांच्या काळजीपूर्वक राखलेल्या मिशा व त्यांच्या विविधरंगी पगड्यांनी, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने कायमचा ठसा उमटवला. ते बहुतेक राजपूत होते आणि रायकाच्या तुलनेत त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे वेगळा होता. रायका अतिशय नम्र आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमी यांच्यावर अवलंबून असत, या लोकांना सर्व समस्या स्वतःच सोडवण्याची सवय होती. त्यांचा एक नेता म्हणजे भोमसिंग, जेमतेम साक्षर, पण अतिशय चतुर व चिकित्सक होता. त्याला परिसराचा इतिहास आणि प्रसिद्ध कुटुंबांच्या वंशावळीबद्दल सर्व काही माहीत होते. स्थानिक बाबी, पारंपरिक पद्धती, ऐतिहासिक व्यक्तिरेखा याविषयी कोणीही त्याला कोणताही प्रश्न विचारू शकत होते आणि त्याच्याकडून माहिती, अनेकदा जणू तो पाठ्यपुस्तक असल्याप्रमाणे बाहेर पडत असे. साद्रीच्या आजूबाजूला बोलल्या जाणाऱ्या भाषेपेक्षा खूप वेगळे असलेले त्याचे तालासुरांतले बोलणे आणि वेगळ्या उच्चारांचा आनंद घेत इल्स त्याला अनेक वेळा ऐकू शकली असती.

मुख्य चरण्याची कुरणे नष्ट झाल्याचा ताण त्यांनाही जाणवत असला तरी, जैसलमेरच्या उंट प्रजननकर्त्यांनी अजूनही प्रचंड कळप बहुतेक वेळा शेकड्यांच्या संख्येत राखून ठेवले होते. जर यांना उंटांना त्यांच्या ऱ्हासापासून वाचवायचे असेल, तर त्यांनी (इल्स व इतरांनी) तिथेच काम करायला हवे होते, कारण उंटांच्या उत्पादनांच्या विक्रीच्या अर्थव्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणात संख्या होती आणि मोठी निकड देखील होती. भूजल साठ्यांच्या ऱ्हासाने चिंताजनक परिस्थिती झाली होती. राजस्थान सरकारने आता नवीन ट्यूबवेल खोदण्यास मनाई केली होती.

या परिस्थितीत, उंट अर्थव्यवस्थेच्या विकासामुळे समाजातील अनेक घटकांना फायदा होऊ शकेल अशा मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. साद्री मधील त्यांच्या कामात दारिद्र्य निर्मूलन आणि ग्रामीण-शहरी स्थलांतर थांबवणे हे नेहमी गरजेचे होते. पण इथे काहीतरी वेगळंच धोक्यात होतं. भूजलाचा साठा, कायमस्वरूपी

संपुष्टात न आणता, प्रदेशाचे संपूर्ण पर्यावरण आणि दीर्घकालीन शाश्वत पद्धतीने जमिनीचा वापर करण्याची गरज होती.

या सर्व विचारांतून त्यांनी एक प्रकल्प प्रस्ताव विकसित केला ज्याचे शीर्षक होते, 'शाश्वत जमिनीच्या वापरासाठी व थरच्या वाळवंटातील सुधारित जीवनमानासाठी पशुपालनाचे पुनरुज्जीवन करणे? त्याचे उद्दिष्ट दीर्घकालीन शाश्वत भूमीचा वापर करून ग्रामीण जीवनाला आधार देणे व राजस्थानची जैवविविधता आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे व यासाठी उंट प्रजननाचे आर्थिकदृष्ट्या पुनरुज्जीवन करणे.

हे साध्य करण्यासाठी उंट प्रजननातून आर्थिक परताव्यातून वाढ मिळवण्यासाठी त्यांनी कुरणासाठी जागा सुरक्षित करण्याचा व विक्रीसाठी नवीन पर्यायांचा शोध घेण्याचा आणि ग्राहकांच्या नवीन मागण्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्याचा प्रस्ताव ठेवला.

हा दृष्टीकोन अत्यंत शहाणपणाचा व खात्रीलायक होता. त्यांच्या सुदैवाने अनुदान देणाऱ्या संस्थेतील धोरणी व सुशिक्षित व उत्साही समन्वयकाला ही कल्पना आवडली. तो दुधाची विक्री करायला उत्सुक होता पण त्याला दुधाची निश्चित हमी होती त्यासाठी तो दबाव आणत होता. शेवटी ते सहमत झाले– हा विचार अविवेकीपणा ठरला. कारण नंतर ठरावीक लक्ष्य गाठण्यास त्यांची फारशी तयारी नव्हती. त्यांना कोणताही अनुभव नसल्यामुळे, दैनंदिन दुधाच्या विक्रीसाठी दुधाचा ठरावीक पुरवठा गाठण्यासाठी हा प्रकल्प अयशस्वी ठरला.

प्रकल्प सुरू करण्यासाठी ते अतिशय अधीर होते. जैसलमेरच्या संथ व अद्भुतरम्य वातावरणाने व लांब पायघोळ झग्यांत, मुख्य चौक, हनुमान चौकांत फिरणाऱ्या मुस्लीम पुरुषांमुळे तिला जॉर्डन व मध्यपूर्वच्या संथ व मंदगती पूर्वेकडच्या बाजाराची आठवण झाली. प्रकल्पाच्या करारावर अधिकृतपणे स्वाक्षरी होण्यापूर्वीच, त्यांनी महत्त्वाच्या धोरणकर्त्यांना प्रकल्पाची माहिती देऊन कामात आणि नवीन आव्हानात स्वतःला झोकून दिले आणि राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांना, तसेच संसद सदस्यांना पत्रे पाठवली. परिसरातून LPPS उपाध्यक्ष, उत्तरा कोठारी, आणि ईल्सला राजस्थानच्या राज्यपाल श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या भेटीची परवानगी मिळाली, ज्या नंतर भारताच्या राष्ट्रपती झाल्या. त्यांना समस्या आणि उंटात रस नव्हता, ईल्स भारतीय जेवणाशी कसा सामना करत होती व तिचे जेवण कोण बनवत होते यांत रस होता..!

जैसलमेरमध्ये, पहिल्या कामांपैकी एक म्हणजे एक ऑफिस भाड्याने ध्यायचे होते. आणि त्यांना ते अचलवंशी कॉलनीमध्ये एका नव्या इमारत सापडले. दगडी जाळीने दर्शनी भाग सुशोभित केलेला होता. हे जैसलमेरच्या वास्तुकलेचे वैशिष्ट्य आहे. साद्रीमधील त्यांच्या ग्रामीण सुविधांच्या तुलनेत या निवासस्थानाचे खरे सौंदर्य होते. त्यांनी स्थानिक नोकरवर्गाची मुलाखत घेतली व वेगवेगळ्या उंट पाळणाऱ्या जातींना समतोल प्रतिनिधित्व देऊन कामावर घेतले, टीममध्ये एक मीरा पालिवाल नावाची स्त्री होती. पालिवाल या विविध उंटपालन करणाऱ्या जातींचे समतोल प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न करणारी, खरी जहाल विचारांची आणि विधवा, घटस्फोटित, अविवाहित महिलांच्या संघटनेची स्थानिक नेता होती.

पुढची पायरी म्हणजे बाहेर जाणे आणि उंट प्रजननकर्त्यांना त्यांच्या गावांत भेट देणे, ते कोठे आहेत हे शोधणे आणि त्यांना चांगली मदत कशी मिळेल हे बघणे. त्यांना कळले की, ते वर्षातून एकदा, चंद्र दिनदर्शिकेतील विशिष्ट दिवशी, इस्लाम धर्म स्वीकारलेल्या काजू फकीर या राजपूताच्या समाधीच्या ठिकाणी जमतात. या सभेसाठी, ते त्यांचे उंट हजारोंच्या संख्येने सोबत

आणतात आणि मंदिरात येणाऱ्यांना समाधीच्या बाजूला टांगलेल्या दोरीच्या खाली नेऊन आशीर्वाद घेतात. हे कळपांचे रोगराई पासून रक्षण करते असे मानले जाते. काजू फकीरचे ठिकाण आर्मी फायरिंग रेंजमध्ये आणि निर्बंधित क्षेत्रात आहे, परंतु हणमंतने तेथे हजर राहून आणि प्रकल्पाची उद्दिष्टे आणि कामे सर्व उंट उत्पादकांना माहिती देण्यासाठी संधीचा फायदा घेतला.

त्यांचा उत्साह व उंट पालन कार्याचे अभिप्राय छान होते. कोणीतरी त्यांच्या व्यवसायात रस घेत असल्याबद्दल पशुपालकांना खरोखर आनंद झाला - बाहेरच कोणीतरी त्यांच्याशी या समस्यांबद्दल बोलण्याची ही पहिलीच वेळ होती याचा ते वारंवार उल्लेख करत.

सुरुवातीपासूनच ते उत्साहाने व सक्रियपणे मैदानात उतरले, त्यांनी स्वतःची समिती स्थापन केली आणि प्रकल्पाची अधिकृत उद्घाटन कार्यशाळा आयोजित करण्याची व्यवस्था केली, त्यासाठी त्यांनी जोशी-का-तालब नावाचे एक ठिकाण निवडले. ते जैसलमेरपासून १५ किमी अंतरावर एका लहान तलावाजवळ, जो कृत्रिमरित्या पाणी साठवण्यासाठी तयार करण्यात आला होता.

नोव्हेंबरच्या एका मोठ्या दिवशी उंटपालक मोठ्या संख्येने जमा झाले. काहीजण उंटावर बसले होते, तर काहीजणांनी त्याचे पूर्ण कळप आणले होते. त्या उंटपालकांनी या सर्वांना ताजे दूध दिले. त्यांच्यात भाट्टी राजपूत होते ते या भागांतील मुख्य रहिवासी होते. त्याच बरोबर राठोड राजपूत व सोढा राजपूत जे पाकिस्तान मधून स्थलांतरित झाले होते, तेथे बिश्नोई समाजही होता जे एकोणतीस नियम पाळतात, निसर्गाची पूजा करतात आणि पोखरणजवळ काही सर्वांत मोठ्या कळपांचे मालक होते. जैसलमेरच्या शाही कुटुंबाच्या मालकीच्या उंटांची काळजी घेणारे रायका देखील होते. तसेच 'सॅम सॅन्ड ड्युन्यस', येथे व्यवसाय करणारे व उंट सफारीवर प्रभुत्व असलेले मुस्लिमही होते. त्यांनी पशुसंवर्धन विभागातील सरकारी अधिकारी आणि स्थानिक खासदारांना बोलावले होते, पण ते आले नाहीत. तथापि, नॅशनल रिसर्च सेंटर ऑन कॅमल आणि जोधपूरमधील इन्स्टिट्यूट ऑफ डेझर्ट मेडिसिनचे कर्मचारी सहभागी झाले.

कार्यक्रमाची सुरुवात तीन गटांमध्ये उंट स्पर्धेने झाली - सर्वोत्कृष्ट उंटांचा कळप, सर्वोत्कृष्ट नर उंट आणि सर्वोत्कृष्ट मादी उंट - पशुवैद्यकीय डॉक्टरांऐवजी, उंट संवर्धकांच्या समितीद्वारे ठरविले गेले. विजेत्यांना अनुक्रमे १,१०० रुपये, ५०१ रुपये आणि २०१ रुपये बक्षीस मिळाले.

कार्यक्रमाच्या तयारीसाठी, इल्सने सर्व साहित्य आणि एक पत्रक एकत्र ठेवले होते त्यांत, उंटापासून बनवल्या जाऊ शकणाऱ्या सर्व उत्पादनांचे वर्णन केले होते. पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे, इल्सने इतरत्र बनवलेल्या वस्तूंची विविधता दाखवली. त्यांत मॉरिटानियामध्ये बनवलेले कॅमेलबर्ट, दुबईचे विशिष्ट चव व वास असलेले दूध, ऑस्ट्रेलियाच्या उंटाच्या कातडीपासून केलेल्या विविध वस्तू तुर्कमेनिस्तानचे लोकरीचे रग, जॉर्डनचे उंटांच्या हाडांचे दागिने, यूएसमधील उंटाच्या दुधाचे साबण यांचा समावेश होता. आणि केनियाहून उंटाच्या दुधाचा ट्रक होता.

नुकतेच इथिओपियातील पशुपालक मेळाव्यातून परतलेले रायका नेते बगदीरामजी यांनी मॉरिटानिया, नायजर, केनिया आणि पंटलँडमध्ये उंट डेअरी स्थापन केलेल्या अनेक आफ्रिकन उद्योजकांना कसे भेटले, वेगवेगळ्या उत्पादन तंत्रांबद्दल त्याने त्यांच्याकडून काय शिकले व त्यांच्यापैकी काही जण उंटाच्या दुधापासून चीज बनवत होते याची माहिती दिली. पशुपालक

अतिशय प्रभावित झाले आणि त्यांनी टाळ्या वाजवून पाठिंबा दिला.

LPPS मध्ये एक सुस्थापित पद्धत आहे, त्यांनी सर्व विशिष्ट विषयांवर चर्चा करण्यासाठी सर्वांना तीन गटांमध्ये विभागले.

पहिल्या गटाने उंटाच्या उत्पादनांची विक्री कशी करावी यावर चर्चा केली, जसे की: दूध-उत्पादन साखळी कशी तयार करावी? उत्पादनांची मागणी कशी वाढवायची? उंट लोकर, उंटाची कातडी आणि हाडांच्या उत्पादनांमध्ये विक्रीची क्षमता होती का? उंट दूध गोळा करणाऱ्या केंद्रांची स्थापना; उद्योजक किंवा प्रशिक्षित दुग्धव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींद्वारे वेगवेगळ्या उत्पादनांसाठी दुधावर प्रक्रिया करणे; आणि उंटांच्या कत्तलीला पाठिंबा न देणे इत्यादी अनेक मुद्दे त्यात होते.

दुसऱ्या गटाने चराण्याची समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आणि उंटांना कसे खायला द्यायचे ज्यामुळे ते उत्पादक होऊ शकतील. वनविभागाला उंटांच्या चारा म्हणून योग्य असलेली आणखी झाडे लावणे शक्य आहे का? वन्यजीव अभयारण्यांवर आधारित उंट अभयारण्य असणे शक्य होते का? त्यांनी असा निष्कर्ष काढला की, उंटांचे खाद्य असलेली रोपे कमी झाली आहेत म्हणून त्यांनी झाडे, झुडपे आणि गवत यांची यादी दिली. दुष्काळात उपलब्ध करण्यासाठी कोरड्या चाऱ्याची निवड. आणि कमी पाणी वापरणारा चारा, पिके आणि गवत यांना प्रोत्साहन दिले आणि काटेरी तारांच्या जागी जिवंत झुडुपे लावण्यावर भर दिला.

शेवटी, तिसऱ्या गटाने धोरण आणि संघटनात्मक स्वरूपाचा शोध घेतला, ज्या धोरणांना उंटपालनासाठी समर्थन देतील आणि त्यांनी एक प्रभावी उंट लॉबी कशी तयार करावी आणि उंट पालक म्हणून संघटित होण्याची गरज यावर गावातील चराईची जागा, दुग्धव्यवसाय सुविधा तसेच कर्ज आणि पशु आरोग्य सुविधांची स्थापना

एवढ्या मेहनतीनंतर, वर्कशॉपच्या मुख्य कार्यक्रमाची वेळ आली. उंटाच्या दुधाच्या आईसक्रीमची चव घेणे. त्यांच्या कर्मचाऱ्यांनी स्ट्रॉबेरी व केशर पिस्ता या दोन चवीमध्ये बनवले होते. त्यांनी समारंभपूर्वक प्लास्टिकचा डबा उघडला आणि साद्री भागातील रायका पुजारी जे राजस्थानच्या पशुधन मंडळाचे अध्यक्ष देखील होते यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रत्येकाने या पदार्थाचे नमुने व त्याची चव घेतली. या घटनेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. जगभरातील माध्यमाने या नवीन उंटाच्या पाककृतीची आनंदाची बातमी केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील वृत्तसंस्थांनी दिली. अगदी एका दिवसात त्यांना, न्यू यॉर्क पब्लिक रेडिओ आणि बीबीसी वर्ल्ड सर्व्हिसकडूनही मुलाखतीसाठी विनंत्या आल्या.

**वर्तमानपत्रातील बातमी**

'थर'च्या वाळवंटातील उंट संवर्धक उंटाच्या दुधाच्या आरोग्यदायी गुणधर्माचा रोकड पैसे मिळविण्यासाठी फायदा घेतात.

उंटाच्या दुधाच्या आइसक्रीमची चव व राजस्थान-स्थित NGO, लोकहित पशु-पालक संस्थान (LPPS) ने पारंपरिक उंट उत्पादकांना अनेक उंट उत्पादनांची आर्थिक क्षमता ओळखण्यास मदत करण्यासाठी दोन वर्षांचा प्रकल्प सुरू केला आहे. उंटपालनाचे पुनरुज्जीवन हे दुष्काळग्रस्त आणि राजस्थानच्या पश्चिमेकडील गरीब भागात उपजीविकेसाठी मदत करणे व शाश्वत जमिनीच्या वापरासाठी महत्त्वाचे साधन आहे.

उंटाचे दूध हे गाई आणि म्हशीच्या दुधापेक्षा आरोग्याच्या दृष्टीने वेगळे आहे, त्याच्यामध्ये enzymes

---

अडचणी आयुष्यात नव्हे, तर मनात असतात.
ज्या दिवशी मनावर विजय मिळवाल त्या दिवशी आपोआप मार्ग निघेल.

व प्रतिजैवक असतात जे रोगांपासून बचाव करतात. म्हणूनच क्षयरोग आणि टायफॉइड बरे करण्यासाठी हे केवळ पारंपरिकपणे वापरले जात नाही तर एचआयव्ही/एड्स, कर्करोग आणि अल्झायमर असलेल्या रुग्णांवर देखील त्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. उंटाच्या दुधाबद्दल कोणतीही ॲलर्जी माहीत नाही आणि लैक्टोज सहन न करणारे लोक देखील ते पिऊ शकतात व शिवाय, उंटाच्या दुधात इन्सुलिन असते आणि त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांमध्ये रक्तातील साखरेची पातळी कमी होते.

उंटाचे दूध अनेक आखाती आणि अनेक आफ्रिकन देशांमध्ये पौष्टिक आहार आणि सौंदर्य उत्पादन म्हणून विकले जाते. उंटाच्या दुधाची जागतिक बाजारपेठ अब्जावधी डॉलर्सची असू शकते, असा अंदाज संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने (FAO केला आहे. त्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

६-८ नोव्हेंबर दरम्यान, उंट प्रजननकर्ते आणि शास्त्रज्ञ जैसलमेरच्या प्राचीन कॅराव्हॅन शहराजवळ तीन दिवसीय कार्यशाळेत भेटले. उंटाचे दूध आणि इतर उंट उत्पादनांच्या विक्रीच्या धोरणांविषयी चर्चा केली. मेळाव्यात, उंट प्रजननकर्त्यांनी ठामपणे सांगितले की, गेल्या दहा वर्षांत त्यांच्या पूर्वजांचे कळप सुमारे ५०% कमी झाले आहेत, कारण त्यांची चरण्याची कुरणे सिंचन शेतीने व्यापली आहेत.

''भूजल पातळी झपाट्याने कमी होत असल्यामुळे जास्त पाणी लागणाऱ्या जमिनींचा वापर संपुष्टात आला आहे आणि उंटपालन राज्याच्या पाण्याच्या समस्येवर एक उत्तम उपाय आहे,'' असे राजस्थान पशुपालक विकास संघटनेचे अध्यक्ष बागडीराम रायका सांगतात.

''आम्ही राजस्थानातील उंट उत्पादकांना त्यांच्या पारंपरिक मालमत्तेचा वापर करून नवीन विक्रीच्या संधींचा फायदा घेताना पाहू इच्छितो'' असे संचालक हणमंत सिंग यांनी स्पष्ट केले. या प्रसंगाने उत्साहित होऊन अनेक उंट प्रजनक लांब, लांबच्या खेड्यातून त्यांच्या जैसलमेरच्या ऑफिसमध्ये आले किंवा त्याच्या समस्येसाठी त्यांना फोन केला. यांचे मुख्य हेतू आजारी उंटांना मदत मिळविण्याचा होता. खूप उंट मॅनगे या त्वचेच्या आजाराने पीडित होते, जो किडे चावून होतो व अतिशय संसर्गजन्य असून त्याने खाज सुटते. उपचार केले नाहीत तर जनावरांचे वजन कमी होते, त्यांची तब्बेत खालावते व मृत्यूही होऊ शकतो. एकदा कळपाला लागण झाली की, त्यावर नियंत्रण ठेवणे अतिशय कठीण असते. पारंपरिक उपचार आहेत पण त्याने खूप वेळ लागू शकतो. कारण त्यामध्ये उंटाच्या संपूर्ण पृष्ठभागावर मलम वापरणे आवश्यक असते. बऱ्याच वेळा प्रत्येक उंटाला एक इंजेक्शन देऊन ते या रोगाचा फैलाव रोखू शकले आणि त्याचा खूप नाट्यमय परिणाम झाला. अनेक उंट प्रजनन करणाऱ्यांनी या रोगामुळे मोठ्या संख्येने प्राणी गमावले होते, ते अत्यंत कृतज्ञ होते आणि त्यांच्याशी ते पूर्वीपेक्षा अधिक आदराने वागले.

हळूहळू त्यांना जैसलमेरच्या असाधारण सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांची कल्पना आली. अत्यंत कमी लोकसंख्येचा हा भाग भारतातील अनेक मुस्लीम आक्रमणांचे प्रवेश स्थान होता. ही जरी दुर्गम भागातील चौकी असली तरी प्रत्यक्षात भारताला चीन, इराण आणि भूमध्य समुद्राशी जोडणाऱ्या प्रमुख व्यापारी मार्गांच्या रस्त्यावर होती. भाट्टी राजपूत ज्यांनी १,००० वर्षांहून अधिक काळ या भागावर राज्य केले होते त्यांची मूळ राजधानी लोदोर्वा शहरात होती. अफगाणिस्तानातील मुस्लीम आक्रमणकर्त्यांनी अनेक वेळा तोडफोड केल्यावर, भाटींनी राजधानी त्रिकुटा टेकडीच्या शिखरावर हलवली आणि ११५५ मध्ये, जैसलमेरमध्ये प्रसिद्ध असलेला सुवर्ण किल्ला बांधला.

सुरक्षित मार्गाच्या बदल्यात कॅराव्हॅनवर कर

आकारणे हे भट्टी राजांचे व्यावसायिक तत्त्व होते. १२७१ पासून आणखी एक समुदाय प्रख्यात झाला, 'पालीवाल ब्राह्मण' जे मध्य राजस्थानमधील पाली येथून मोठ्या संख्येने स्थलांतरित झाले होते. त्यांना शेती कशी करावी हे माहीत होते आणि त्यांनी खादीन नावाचे एक खास तंत्र विकसित केले, जे पावसाचे पाणी थोड्याशा खोलगट भागात साचवून ठेवते. त्यामुळे अतिशय कोरड्या भागांत गहू पिकवणे शक्य झाले. हे लोक व्यापारही करत व या भागांत त्यांच्या मोठ्या वस्त्या व वाळवंटांत शहरेही होती.

१८१८ मध्ये जैसलमेर ब्रिटिश राजवटीखाली आले. ते काहीकाळ मोठ्या प्रमाणावरचा अफू, सिल्क, नीळ, सुकामेवा व इतर गोष्टींच्या व्यापारामुळे भरभराटीस आले. पण नंतर मुंबईला बंदर बांधल्यावर हा व्यापार कमी झाला. जैसरमेलची लोकसंख्या खूप कमी झाली. पण खाण व्यवसाय व ऊर्जा व्यवसायामुळे अर्थव्यवस्था सुधारली आहे.

ऐतिहासिक गोष्टींतून हे स्पष्ट होते की, जैसलमेरची पूर्वीची संपत्ती पूर्णपणे उंटांवर अवलंबून होती. वाळवंटातून व्यापारी मार्ग उभारण्यासाठी त्यांची गरज होती. शिवाय, खादीन जमीन नांगरण्यासाठी आणि पाणी उपसण्यासाठी उंटांची गरज होती; उंटांना अत्यंत वरचा दर्जा मिळाला होता. प्रत्येक घरात एकेकाळी वाहतुकीसाठी आणि घरातील कामांसाठी एक नर उंट होता. परंतु, मादी प्रजनन उंटांची मालकी हा स्थानिक उच्चभ्रू लोकांचा विशेषाधिकार होता; तसेच राजा, कुलीन आणि प्रमुख वंशांकडे होता. मादी उंटाचे महत्त्व एका जुन्या म्हणीमध्ये व्यक्त केले गेले आहे. 'अनेक उंट असलेल्या गावात माझे लग्न करा.' पूर्वीच्या काळी मुलींनी त्यांच्या पालकांना मादी उंटांसह कुटुंबात किंवा गावात लग्न करण्याची विनंती केली होती, कारण याचा अर्थ उंट हे सुरक्षितता, दळणवळण व संपर्काचे साधन होते. पण आता परिस्थिती बदलली होती. जुन्या पिढीला अजूनही उंटाविषयी प्रेम व आकर्षण होते. पण आता काळ बदलला होता.

पण जलद आर्थिक प्रगतीमुळे तरुणांना अनेक संधी उपलब्ध होत्या. शिकलेली मुलं त्यांच्या वडिलांना नेहमी सांगत राहिली, 'उंटांपासून दूर व्हा.' पण त्यांच्या वडिलांचे म्हणणे होते की , 'उंटांमुळे त्यांच्या शिक्षणाचा खर्च करता आला. आता त्यांनी त्यांना कसे काय विकायचे ?' हे, एका उंटपालकाने ज्याचा मुलगा वकील झाला होता त्याने यांना सांगितले. उंटपालक असल्यामुळे लग्न होण्यास अडचण येत होती. याचा संबंध नर व मादी यांच्या स्थानिक संख्येशी होता. लग्नाच्या बाजारांत मुलीं पेक्षा मुले जास्त होती.

महिलांबरोबर कामाचे समन्वय साधणाऱ्या मीराने त्यांना सांगितल्याप्रमाणे, जैसलमेर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मुली–बालकांची भ्रूणहत्या – पूर्वी राजपूतांमध्ये खूप प्रचलित होती, कारण ती लग्नाच्यावेळी होणाऱ्या खर्चाशी संबंधित होती! या गावांचे स्थानिक भाषेत वर्णन केले जाते, 'एक दशकाहून अधिक काळ बारात (लग्नाची मिरवणूक) पाहिली नाही. त्याचा अर्थ त्या गावांमध्ये, मुलींची अनुपस्थिती होती. कारण जन्मतःच त्यांची हत्या होत असे. यामध्ये खेड्यातील परिचारिकांच्या संगनमताने हत्या जन्मापासून होती. मीराच्या म्हणण्यानुसार, त्यांचे तोंड बंद ठेवण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला जात असे. हे काम छुप्या पद्धतीने सुरू होते. हे कृत्य जन्मताच लगेचच अफू देऊन व त्यांचे दफन चोरून 'दरोगा' तर्फे केले जात असे. (दरोगा ही राजपूत मुख्य आणि उच्चभ्रू लोकांसाठी घरातील नोकरांची जात) विविध मदतकार्य करणाऱ्या संस्थांनी हे थांबवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना फारसे यश आले नाही. हे अतिशय दहशतवादी कृत्य गावांमध्ये

(पृष्ठ क्र. २८ वर)

आपण जे देतो ते आपल्याकडे परत येतं; त्यामुळे चांगलं द्या, चांगलंच मिळेल.

# भारतीय सनातन नीतिशास्त्रांची समृद्ध परंपरा: परिचय व जीवनमूल्ये (भाग १)

*भारतीय असणारी जुन्या काळांतील नीतीविषयक सारी शास्त्रे आजदेखील अभ्यासावीत इतकी प्रगल्भ आहेत. त्यांचा सर्वसामान्यांनी अभ्यास करावा. - संपादक*

भारतीय सनातन संस्कृतीत नीतिशास्त्र हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्राचीन शास्त्रविभाग मानला जातो. 'नीती' म्हणजे आचारधर्म, योग्य-अयोग्य याविषयीचे विचार, तर 'शास्त्र' म्हणजे तत्त्वनिष्ठ मांडणी. भारतीय परंपरेत नीतिशास्त्र केवळ वैयक्तिक सदाचारापुरते मर्यादित नसून; ते राज्यव्यवस्था, समाजरचना, न्यायसंस्था, आंतरराष्ट्रीय संबंध, मित्र-शत्रू व्यवहार, तसेच आध्यात्मिक आचरण यांचा सुद्धा आधारस्तंभ ठरते.

महाभारत, स्मृतीग्रंथ, उपनिषदं आणि गीता या धर्मग्रंथांपासून ते आचार्य चाणक्य यांचे अर्थशास्त्र, महोपाध्याय कामंदक यांचे नीतिसार, महाकवी भर्तृहरी यांचे नीतिशतक, आचार्य विष्णुशर्मा यांचे पंचतंत्र अशा ग्रंथांमध्ये नीतिशास्त्राची विविध रूपे व परंपरा दिसतात.

या ग्रंथांचा अभ्यास केला असता असे आढळते की, काही ग्रंथ राज्यनीती व दण्डव्यवस्थेवर भर देतात (उदा. आचार्य चाणक्यांचे अर्थशास्त्र, कामंदकाचार्यांचे नीतिसार), काही धर्मशास्त्रपर स्मृती म्हणून सामाजिक-न्यायव्यवस्था व दायिक कायदे सांगतात (उदा. महर्षी मनु कृत मनुस्मृती, महर्षी याज्ञवल्क्य कृत याज्ञवल्क्य-स्मृती, महर्षी नारद कृत नारदस्मृती), काही नीतिकाव्ये व सुभाषितसंग्रह मानवी आचार-विचारांवर केंद्रित आहेत (उदा. महाकवी भर्तृहरी यांचे नीतिशतक, आचार्य चाणक्यनीती), तर काही कथारूप उपदेशात्मक ग्रंथ सामान्य जनतेस बोध देण्यासाठी लिहिले गेले (उदा. आचार्य विष्णुशर्मा कृत पंचतंत्र, पंडित नारायण कृत हितोपदेश).

महाभारतातील विदुरनीती (धर्मनिष्ठ महर्षी विदुर यांचा उपदेश) व भगवद्गीता (भगवान श्रीकृष्ण व अर्जुन संवाद) या दोन ग्रंथांशांमध्ये तर धर्म, कर्तव्य आणि राजधर्माचा अत्यंत तात्त्विक विचार मांडलेला आहे.

अशा विविध परंपरांनी मिळून भारतीय नीतिशास्त्राची एक समृद्ध आणि बहुपर्यायी परंपरा घडविली आहे. यामुळे भारतीय समाजाला केवळ राजकीय व सामाजिक मार्गदर्शनच नव्हे, तर नैतिक मूल्ये, कर्तव्यबुद्धी आणि धर्माधिष्ठित जीवनमूल्ये यांचे दृढ अधिष्ठान प्राप्त झाले.

### १. भारतीय हिंदू सनातन नीतिशास्त्रांची स्वरूपे व व्याप्ती

भारतीय नीतिशास्त्राचे स्वरूप विविध अंगांनी विभागले गेलेले दिसते. संशोधक व विद्वानांच्या मते ते साधारणपणे खालील गटांत मोडते :

### १.१ नीतिशास्त्रांचे वर्गीकरण : एक संक्षिप्त आढावा

| श्रेणी | उप-श्रेणी/ प्रातिनिधिक उदाहरणे | केंद्रबिंदू (प्रमुख आशय) |
|---|---|---|
| राज्यनीती/दण्डनीती ग्रंथ | अर्थशास्त्र (कौटिल्य), नीतिसार (कामंदक), शुक्रनीती (शुक्राचार्य-विवादित दिनांकन), विदुरनीती (महाभारत) | राज्यकारभार, कूटनीती, युद्ध-शांतिधोरण, दण्डव्यवस्था |

| | | |
|---|---|---|
| धर्मशास्त्र-स्मृतीतील नीतिनियम | मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, नारदस्मृती, पराशर स्मृती, बृहस्पती स्मृती | सामाजिक/नागरी आचार, न्याय, राजधर्म, दायिक-वारसा, व्यवहार |
| नीतिकाव्य/सूक्ते | भर्तृहरीचे नीतिशतक, चाणक्यनीती (सुभाषितसंग्रह) | वैयक्तिक आचरण, सद्गुण-दुर्गुण, व्यवहारज्ञान |
| कथानीती (उपदेशात्मक कथा) | पंचतंत्र (विष्णुशर्मा), हितोपदेश (नारायण पंडित) | कथांमधून नीतिउपदेश, राजकारण/मैत्री/वैर-धोरण |
| महाकाव्यांतील नीती प्रकरणे | भगवद्गीता, विदुरनीती (उद्योगपर्व), विदुर-उपदेश | धर्म, कर्मयोग/भक्तियोग/ज्ञानयोग, राजधर्म |
| तुलनात्मक/आयातीत नीतिकथा | (भारतात रूढ) ईसपाच्या गोष्टी (Aesop's Fables) | रूपक-कथांतून नैतिक बोध; प्राचीन ग्रीक परंपरा |

**१.२ प्रमुख नीतिग्रंथ : तक्त्यात्मक माहिती**

| **नीतिग्रंथाचे नाव** | **आचार्य / प्रणेते** | **कालखंड (अंदाजे)** | **साहित्यसार** |
|---|---|---|---|
| अर्थशास्त्र | आचार्य कौटिल्य (चाणक्य) | इ.स.पू. २रे शतक - इ.स. ३रे शतक; काही भाग मौर्यकालीन परंपरेचे | राज्यरचना, दण्डनीती, गुप्तचरव्यवस्था, वित्त-कर, युद्ध/कूटनीती, अर्थ-राजनीती |
| नीतिसार (कामंदकीय) | महोपाध्याय कामंदक | गुप्त/पश्चात-गुप्त काळ; साधारण इ.स. ३रे-७वे शतक | कौटिल्य-परंपरेचे संक्षिप्त/स्वतंत्र विवेचन; साम-दान-भेद-दण्ड व उपेक्षा संकल्पना |
| शुक्रनीती | आचार्य शुक्राचार्य (परंपरा) | दिनांकन विवादित; काही संशोधक मध्ययुगीन-आधुनिक | राज्यनीती, प्रशासन, समाज-नीती विषयक सूक्ते |
| चाणक्यनीती | आचार्य चाणक्य (अर्पित, संकलन) | मध्ययुगीन संकलन मानले जाते | वैयक्तिक व राजकीय आचरणावरील नीतीसुभाषिते |
| नीतिशतक | महाकवी भर्तृहरी | इ.स. ५वे-७वे शतक | १०० नीतीसुभाषिते-सद्गुण, दुराचार, धन, विद्या, धैर्य |
| पंचतंत्र | आचार्य विष्णुशर्मा (परंपरा) | इ.स.पू. २०० - इ.स. ३०० (संहिताकरण) | प्राणीकथा-रूपाने राज्यनीती, मित्र-शत्रुता, उपाययोजना |
| हितोपदेश | पंडित नारायण | इ.स. ८वे-९वे शतक (काही ठिकाणी १२वे) | पंचतंत्रावर आधारित स्वतंत्र कथासंग्रह |

| | | | |
|---|---|---|---|
| विदुरनीती (महाभारत) | महर्षी विदुर (महाभारत परंपरा) | महाभारतकालीन (उद्योगपर्व) | राजधर्म/वैयक्तिक आचारांवरील नीती-उपदेश |
| भगवद्गीता (महाभारत, भीष्मपर्व) | भगवान श्रीकृष्ण व अर्जुन संवाद (परंपरेने व्यासकृत) | इ.स.पू. २०० - इ.स. २०० | धर्म, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग; कर्तव्यनीती |
| नारदस्मृती | महर्षी नारद | इ.स. ५वे शतक | न्याय, नागरी/दायिक कायदे |
| याज्ञवल्क्य स्मृती | महर्षी याज्ञवल्क्य | इ.स. ३रे-५वे शतक | आचार-व्यवहार-प्रायश्चित्त त्रिपादी रचना |
| मनुस्मृती | महर्षी मनु | इ.स.पू. २रे - इ.स. २रे शतक | समाजव्यवस्था, राजधर्म, दण्ड, वारसा |
| बृहस्पती स्मृती | महर्षी बृहस्पती | पुढील काळातील (महर्षी याज्ञवल्क्यानंतर) | व्यवहार, न्याय, राजधर्म; आज फक्त उद्धरणांनी उपलब्ध |
| पराशर स्मृती | महर्षी पराशर | मध्यमयुगीन (कलियुगधर्म) सामाजिक नियम | गृहस्थ-आचार, प्रायश्चित्त, |
| ईसपनीती (Aesop's Fables) | ईसप (ग्रीक परंपरा) | इ.स.पू. ४ थे शतक - इ.स. २ रे शतक | रूपककथांतून नैतिक बोध; भारतातही प्रभाव |

**२. भारतीय नीतिशास्त्राचे जीवनमूल्यांवरील योगदान**

भारतीय नीतिशास्त्र ही केवळ नियमांची वा शिस्तीची संहिता नसून, जीवनाला दिशा देणारी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. या नीतितत्त्वांनी जीवनाला धर्माधिष्ठित दृष्टी दिली असून, धर्म म्हणजे केवळ धार्मिक आचार नव्हे, तर कर्तव्य, न्याय, सत्य, दया व समन्याय या मूल्यांचा पाया आहे. मनुस्मृतीतील 'धर्मो रक्षति रक्षितः' हा श्लोक धर्माचे रक्षण करणाऱ्या व्यक्तिलाच धर्माचे संरक्षण लाभते हे अधोरेखित करतो. सत्य व अहिंसा ही मूल्ये महाभारत, उपनिषद, बौद्ध व जैन परंपरेत सर्वोच्च मानली गेली आहेत; कारण सत्याशिवाय समाजाचा पाया ढळतो आणि अहिंसेशिवाय मानवता अपूर्ण राहते. म्हणूनच महाभारतातील 'सत्यं वद, धर्मं चर' हा उपदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. नीतिशास्त्राने मानवजीवनाचे ध्येय धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांत स्पष्ट केले आहे; या चौघांच्या संतुलनामुळे जीवन परिपूर्ण होते, ज्याचे प्रतिपादन 'धर्मार्थकाममोक्षाणां उपायः सर्वसिद्धये' या मनुस्मृतीतील वचनात आहे. कर्तव्यप्रधान जीवन हीसुद्धा भारतीय नीतिशास्त्राची देण आहे. भगवद्गीतेतील 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या भगवान श्रीकृष्णांच्या उपदेशातून कर्माला व कर्तव्याला केंद्रस्थान देण्यात आले आहे. त्याचबरोबर विदुरनीतीने प्रतिपादलेले 'परहितार्थं ये चरन्ति साधवः' हे तत्त्व समाजहित व लोकसंग्रहाचे महत्त्व अधोरेखित करते. व्यक्तीचे कल्याण हे समाजकल्याणाशीच निगडित असल्याने सेवा, दान, समता व सहानुभूती यांसारखी मूल्ये समाजात दृढ झाली. अखेरीस, नीतिशास्त्राचे ध्येय केवळ सांसारिक समृद्धी नसून आत्मज्ञान, आध्यात्मिक प्रगती व मोक्षप्राप्ती आहे; उपनिषदातील 'आत्मानं विद्धि,

मोक्षमार्गं चर' हा संदेश त्या उन्नत ध्येयाकडे निर्देश करतो. या सर्व विविध पैलूंमुळे भारतीय नीतिशास्त्राने जीवनाला धर्म, सत्य, कर्तव्य, समाजहित व आध्यात्मिक उन्नती अशी समग्र जीवनमूल्ये प्रदान करून भारतीय संस्कृतीला शाश्वत अधिष्ठान दिले आहे.

### ३. भारतीय न्यायव्यवस्था आणि दंडसंहितेतील नीतिशास्त्रीय तत्त्वांचे योगदान

भारतीय नीतिशास्त्र हे केवळ तत्त्वज्ञानापुरते मर्यादित नसून, त्याचा प्रभाव भारतीय न्यायव्यवस्थेवर, दंडसंहितेवर आणि आधुनिक न्यायतत्त्वांवरही स्पष्टपणे दिसून येतो. धर्म, न्याय, कर्तव्य आणि समाजातील सुव्यवस्था यांचा विचार करणाऱ्या नीतिग्रंथांनी आजच्या कायदा व न्यायसंस्थेला दिशा दिली आहे. **मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृती, महाभारत, कौटिलीय अर्थशास्त्र** यांसारख्या ग्रंथातील विचार न्याय, शिक्षा, जबाबदारी, प्रामाणिकता आणि समानता या मूल्यांमध्ये परिवर्तित झाले आहेत. भारतीय दंडसंहिता (IPC), भारतीय पुरावा अधिनियम (Indian Evidence Act) आणि भारतीय राज्यघटना (Indian Constitution) यामध्ये या नीतितत्त्वांचा आधार घेतलेला दिसतो. खालील तक्त्यामध्ये याचे स्पष्टीकरण दिले आहे.

| **प्राचीन स्रोत (ग्रंथ/तत्त्व)** | **तात्त्विक नीती (मुख्य तत्त्व)** | **आधुनिक भारतीय कायद्यातील/ न्यायव्यवस्थेतील प्रतिबिंब** |
|---|---|---|
| मनुस्मृती | धर्म हा न्यायाचा मार्गदर्शक तत्त्व | भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना – न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता |
| मनुस्मृती अध्याय ८ | न्यायदान करताना सर्वांना समान वागणूक | कलम १४ – कायद्यापुढे सर्व समान |
| याज्ञवल्क्य स्मृती | पुरावा, साक्षीदार, शपथ यांचे महत्त्व | भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ – पुरावा व साक्षीचे नियम |
| कौटिल्य अर्थशास्त्र | दंडनीती – शिक्षा ही प्रतिबंधक + सुधारक असावी | भारतीय दंडसंहिता (IPC) – प्रतिबंधक व सुधारात्मक शिक्षा |
| कौटिल्य अर्थशास्त्र अध्याय ३ | भ्रष्टाचार नियंत्रण व अधिकारी वर्गावर तपास | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ |
| महाभारत (शांतिपर्व) | न्याय हा दयाळूपणा, समता आणि धर्माशी जोडलेला असावा | न्यायिक सक्रियता (Judicial -ctivism) व मानवी हक्कांचे स्पष्टीकरण |
| नारदस्मृती | करारभंग, फसवणूक यावर दंड | भारतीय करार अधिनियम, १८७२ |
| बृहस्पती स्मृती | वारसा, स्त्रीधन, कुटुंबीय हक्क | हिंदू वारसा अधिनियम, १९५६ |
| अपस्तंब धर्मसूत्र | दंड हा अपराधाच्या प्रमाणात असावा | भारतीय दंडसंहितेतील शिक्षा ठरविण्याची तत्त्वे |

| | | |
|---|---|---|
| हितोपदेश / पंचतंत्र | न्यायासाठी नीती व प्रज्ञा यांचे महत्त्व | वैकल्पिक विवाद निवारण पद्धती (ADR), मध्यस्थी |
| भगवद्गीता (श्रीकृष्णांचे उपदेश) | स्वधर्मपालन आणि निःस्वार्थ कर्म | न्यायाधीशांचे नैतिक मूल्य व आचारसंहिता (Judicial Ethics Conduct) |

भारतीय नीतिशास्त्राचा प्रभाव केवळ तत्त्वज्ञान व धार्मिक ग्रंथांपुरता मर्यादित राहिला नाही, तर तो न्यायव्यवस्था, दंडसंहिता, समाजजीवन आणि मानवी मूल्यांमध्येही खोलवर रूजला आहे. प्राचीन नीतिग्रंथांतील सत्य, अहिंसा, न्याय, समता, करुणा, कर्तव्यभावना आणि जबाबदारी या मूलभूत तत्त्वांचा प्रभाव आधुनिक भारतीय न्यायव्यवस्था व दंडसंहितेत स्पष्टपणे जाणवतो. यामुळे न्यायप्रक्रिया ही केवळ कायद्यापुरती न राहता, मूल्याधिष्ठित आणि नैतिकतेवर आधारित ठरते. नीतिशास्त्रीय अधिष्ठानामुळे भारतीय न्यायव्यवस्था आजही समाजहित, न्यायप्राप्ती आणि मानवी जीवनमूल्यांच्या रक्षणासाठी सक्षम ठरली आहे. म्हणूनच नीतिशास्त्र व न्यायव्यवस्था यांचा परस्पर संबंध भारतीय संस्कृतीच्या सातत्यशील परंपरेचे प्रतिक मानला जातो.

## ४. कथा : नीतिशिक्षेचा खजिना

भारतीय पंचतंत्र कथा ही जीवनाला दिशा देणारी शाश्वत शिकवण आहेत. 'चार विद्वान आणि सिंह' या कथेने दाखवले की; केवळ शास्त्रज्ञान असून चालत नाही; त्यासोबत विवेक आणि व्यवहारज्ञान असणे आवश्यक आहे. शहाणपणाशिवाय विद्या विनाशकारी ठरू शकते. या कथेप्रमाणे, चार ब्राह्मण मित्र होते. त्यापैकी तिघे अतिशय विद्वान होते – त्यांना शास्त्राचे, तंत्रज्ञानाचे मोठे ज्ञान होते, पण जीवनातील व्यवहारज्ञान नव्हते. चौथा मात्र शास्त्रात मागे होता, पण तो अत्यंत शहाणा व व्यवहारकुशल होता. एकदा ते चौघे मिळून नशीब आजमावण्यासाठी वनात गेले. तेथे त्यांना सिंहाची हाडांची कवटी आणि सांगाडा दिसला. विद्वान तिघांनी आपले शास्त्रज्ञान दाखवण्यासाठी सिंहाला पुन्हा प्राण द्यायचे ठरवले. एकाने हाडांना जोडले, दुसऱ्याने मांस व रक्त दिले, आणि तिसऱ्याने प्राण फुंकून सिंहाला जिवंत करण्याची तयारी केली. त्याक्षणी चौथा मित्र म्हणाला, – ''थांबा! हा सिंह पुन्हा जिवंत झाला तर तो आपल्यालाच फाडून टाकेल. हे करणे धोकादायक आहे.'' पण विद्वान मित्रांनी त्याची थट्टा उडवली – ''तुला शास्त्र कळत नाही म्हणून तुझी भीती आहे.'' अशावेळी तो चौथा मित्र जवळच्या झाडावर चढून बसला. जसा सिंह जिवंत झाला, तसा त्याने तिघा विद्वानांवर झडप घातली व त्यांना ठार केले. चौथा शहाणा मात्र सुरक्षित राहिला. या कथेचा बोध असा की, केवळ शास्त्रज्ञान अपूर्ण आहे; जर त्यासोबत व्यवहारज्ञान व विवेक नसेल. केवळ पुस्तकातील विद्वत्ता जर शहाणपणाशिवाय वापरली तर ती विनाशकारी ठरू शकते. खरी नीतिशिक्षा म्हणजे विद्या + बुद्धी + विवेक यांचा संगम.

'सिंह आणि उंदीर' या कथेतून आपल्याला कळते की, मोठ्याला मदत करण्याची ताकद लहानातही असते. दयाळूपणा व दयाभाव यांचे फळ नेहमी गोडच मिळते. कासव आणि हंस यातून संयम राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे – अति बोलणे वा आवर न ठेवणे माणसाला संकटात टाकते.

'कावळा आणि ससा' ही कथा चुकीच्या मित्रांच्या संगतीचे दुष्परिणाम दाखवते. विवेकाने केलेली निवडच खरी मैत्री ठरते. तर 'सिंह, कोल्हा आणि उंट' या कथेतून मूर्खपणा व आंधळा विश्वास यामुळे होणारा विनाश स्पष्ट होतो.

या सर्व कथांमधून आपल्याला नीतिशिक्षणाचे अनमोल मूल्य मिळते – विद्या, विवेक, दया, संयम आणि योग्य संगत हेच यशस्वी व सुरक्षित जीवनाचे खरे आधारस्तंभ आहेत.

भारतीय नीतिशास्त्र, पंचतंत्र, हितोपदेश तसेच न्यायव्यवस्थेतील नीतितत्त्वे हे सर्व मानवी जीवनासाठी मार्गदर्शक आहेत. कथा ही नीतिशिक्षेचा खजिना असून; समाजातील नैतिकता, न्याय, प्रामाणिकपणा, सत्य, धैर्य, संयम या सद्गुणांना आकार देते. भारतीय न्यायसंहितेतही नीतिशास्त्रीय तत्त्वांचे प्रतिबिंब दिसून येते. येणाऱ्या काळात आपण ह्याची सांगोपांग चर्चा करणार आहोत.

**संदर्भ सूची :**


१. सोमदेव, **पंचतंत्र** – मराठी अनुवाद, मौज प्रकाशन.

२. नारायण पंडित, **हितोपदेश** – मराठी आवृत्ती, श्रीविद्या प्रकाशन.

३. ईसप, **ईसपनीती** (**Aesop's Fables**) – मराठी अनुवाद, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

४. भास्कराचार्य, **नीतिशतक** – मराठी व्याख्या व स्पष्टीकरण, अटलांटिक प्रकाशन.

५. कौटिल्य, **अर्थशास्त्र** – नीतिशास्त्रीय व राज्यकारभार विषयक ग्रंथ, मराठी भाषांतर, डायमंड पब्लिकेशन्स.

६. नारायणराव काळे, **भारतीय नीतिशास्त्र** : परंपरा व वर्तमान, मराठी विश्वकोश मंडळ.

७. न्यायशास्त्र व दंडसंहिता, **भारतीय दंडसंहिता (**IPC**) आणि भारतीय पुरावा कायदा** – नीतितत्त्वांशी निगडित संदर्भ, भारत सरकार प्रकाशन.

८. लोकमान्य टिळक, **गीता रहस्य** – भगवद्गीतेतील कर्मयोग, नीतितत्त्वे व जीवनमूल्ये.

९. श्रीमद्भगवद्गीता – श्रीकृष्णाच्या उपदेशातील नीतिशिक्षा.

१०. बाळशास्त्री जांभेकर, **नीतिशास्त्र आणि समाज** – मराठी निबंधसंग्रह.



**– डॉ. महेश मनोहर भानुशाली**
बी.ई. (यांत्रिक अभियांत्रिकी), एम.एम.एस.
(मुंबई), पीएच.डी. (मुंबई विद्यापीठ)
सहाय्यक प्राध्यापक
डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन
अध्ययन संस्था, ठाणे


•••

---

(पृष्ठ क्र. २२ वरून – **उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष**)

होत होते. सुदैवाने इल्स व तिचे सहकारी तेथे काम करत नव्हते.

जे उंट पाळत होते त्यांना विशेषत: 'अनाकर्षक वधू सामग्री' म्हणून ओळखले जात असे आणि त्यांना पत्नी मिळण्याची शक्यता कमी होती. त्यांचा स्वयंपाकघरांत काम करणारा मुलगा ४० वर्षांचा होता, तरी त्याचे लग्न झालेले नव्हते. जेव्हा उंट उत्पादकांशी त्यांच्या समस्यांबद्दल बोललो तेव्हा हा मुद्दा नियमितपणे समोर आला. ''उंट प्रकल्पाऐवजी तुमचा 'बॅचलर प्रोजेक्ट' असावा आणि ते सर्व लग्न करतील ते पहा'', आमच्या प्रकल्पातील एक लोकप्रिय विनोद बनला.

(क्रमश:)


**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल, ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६


•••

---

माणूस स्वतःच स्वतःचा भाग्यविधाता असतो.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**श्री समर्थ सेवक मंडळाच्या स्त्री कल्याण संघटना वक्तृत्व स्पर्धा विजेत्या –**

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत आमच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणांद्वारे त्यांचा आत्मविश्वास, स्पष्टता आणि सर्जनशीलता दाखवली!

इयत्ता १ली – स्वरा आठवले – प्रथम क्रमांक

इयत्ता २री – धेया सनानसे – द्वितीय क्रमांक

इयत्ता ३री – १. स्वरा रावते – प्रथम क्रमांक
२. शुभा उतेकर – प्रथम क्रमांक
३. सारा वैद्य – द्वितीय क्रमांक

इयत्ता ४थी – अनुश्री उगाळे – द्वितीय क्रमांक

सर्व विजेत्यांचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आणि अशा उत्साहाने आणि आत्मविश्वासाने बोलल्याबद्दल सर्व सहभागींचे हार्दिक अभिनंदन!



चमकत रहा आणि असेच तुम्ही मनापासून बोलत रहा!

**आंतरराष्ट्रीय Spell Bee परीक्षेचा निकाल**

स्तर पहिला – आंतरशालेय स्तर

Spell Bee परीक्षेचा निकाल जाहीर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी आंतरशालेय स्तरावर उत्तम कामगिरी बजावली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

* एका विद्यार्थ्याला आंतर शालेय सर्वोत्तम गुण मिळाले आहेत.
* ३ विद्यार्थ्यांना शाळेमध्ये सर्वोत्तम गुण मिळाले आहेत व त्यांना पदक व उत्कृष्ट कामगिरीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
* ५ विद्यार्थ्यांना वर्गामध्ये सर्वोत्तम गुण मिळाले आहेत व त्यांना प्रमाणपत्र देखील देण्यात आली आहेत.

**आंतरशालेय सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :–**

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. कजरे दियान सचिन | २ री | १०० |

**शाळेमध्ये सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :–**

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कांचे इझान हरीश | १ ली | ९८ |
| २ | म्हात्रे अथर्व अक्षय | १ ली | ९८ |
| ३ | आंब्रे आद्यांत अविनाश | ३ री | ९८ |

**वर्गामध्ये सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :–**

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | शहा ग्रिवा हार्दिक | १ली | ९२ |
| २ | छेडा हितांश विपुल | १ली | ९२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | छेडा तत्व दिनेश | १ली | ९२ |
| ४ | जोशी अन्वय श्रेयस | ३री | ९५ |
| ५ | परब ओम प्रशांत | ३री | ९५ |



**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग**

### शाळेतील विद्यार्थ्यांचा लक्सेंबर्ग येथे आयोजित आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग

शाळेच्या विद्यार्थ्यांनी २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत लक्सेंबर्ग येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन २०२५ मध्ये महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला.

इयत्ता ९वी चे विद्यार्थी आर्यन म्हात्रे, अनिश बर्वे आणि सोहम बेडेकर यांनी Smart Way to Check Carbon Emission Caused by Vehicles या अभिनव प्रकल्पाद्वारे शाळेचे आणि अनुषंगाने भारताचे प्रतिनिधित्व केले.



हा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी वि.प्र.मं. चे अध्यक्ष डॉ. व्ही. व्ही. बेडेकर, सदस्य डॉ. महेश बेडेकर यांचे सहकार्य, तसेच डॉ. सुधाकर आगरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थचे सदस्य श्री. रसाळ यांचे साहाय्य लाभले.

विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या विज्ञान विषयाच्या शिक्षिका सौ. गौरी मोहिले यांचे २८ ऑक्टोबर रोजी लक्सेंबर्गमध्ये आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले. त्याच संध्याकाळी आयोजकांमार्फत आयोजित करण्यात आलेल्या पिझ्झा आणि बॉलिंग इव्हेंट या अनोख्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.

२९ ऑक्टोबर रोजी या प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन पार पडले. याच दिवशी इंरनॅशनल स्नॅक शेरिंग या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपले पारंपरिक भारतीय पदार्थ चकली, लाडू, तिखट शेव आणि शंकरपाळीची मेजवानी उपस्थितांना दिली.



तसेच आयोजकांतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक समारंभात विद्यार्थ्यांनी भगवान श्रीकृष्ण यांना अर्पण केलेले सुंदर भजन सादर केले. यावेळी प्रेक्षकांनी टाळ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात त्यांना दाद दिली.

३० ऑक्टोबर रोजी हे आंतराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन लक्सेंबर्ग येथील व्हिक्टर हयगो या सभागृहात


जनसामान्यांसाठी खुले करण्यात आले. या वेळेस विद्यार्थ्यांच्या स्टॉलला उपस्थितांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. शाळेसाठी आणि भारतासाठी सर्वोच्च अभिमानाचा क्षण म्हणजे लक्सेंबर्गचे पंतप्रधान श्री. लूक फ्रीडन यांनी त्यांच्या स्टॉलला भेट दिली व त्यांच्या प्रकल्पाचे कौतुक केले.



दि. ३१ ऑक्टोबर रोजी या तीन दिवसीय विज्ञान प्रदर्शनाची सांगता करण्यात आली.

दि. १ नोव्हेंबर रोजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षिकेसोबत भारतासाठी प्रस्थान केले.

या प्रदर्शनात ह्या विद्यार्थ्यांनी विविध देशांतील प्रदर्शनीला भेट देऊन, त्यांचा प्रकल्प जाणून घेऊन, स्वतःच्या माहितीत भर करून घेतली. शाळेच्या प्रकल्पाला भेट देणाऱ्या आंतरराष्ट्रीय पाहुण्यांना आपला प्रकल्प समजवून देत असताना त्यांच्या शंकेचे निरसन विद्यार्थी करत होते. लक्सेंबर्गच्या पंतप्रधानांसोबतची भेट तर त्यांना छान अनुभूती देऊन गेली. हा प्रकल्प आमचा आत्मविश्वास दृढ करण्यास नक्कीच प्रभावशाली बनला असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. या संपूर्ण प्रवासाने विद्यार्थ्यांना विज्ञान, संस्कृती आणि जागतिक सहकार्य यांचा अनमोल अनुभव दिला.



सौ. गौरी मोहिले या अनुभवांबद्दल बोलताना सांगतात की, 'या प्रदर्शनात इतर आंतरराष्ट्रीय शिक्षकांसोबत शैक्षणिक विषयावर संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यांचे विविध विषयांवरचे विविध प्रकल्प जाणून घ्यायला मिळाले. आपल्या शाळेचे प्रतिनिधीत्व करण्याची सुवर्णसंधी दिल्याबद्दल आमच्या मुख्याध्यपिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी दिल्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करते.'

मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की, 'आमच्या या भावी शास्त्रज्ञांचे स्वागत करताना मला आनंद होत आहे. त्यांचे परिश्रम, निष्ठा आणि उत्कृष्टता ही शाळेसाठी गौरवाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी प्रकल्पा बद्दल घेतलेली मेहनत चिकाटी, कष्ट, प्रकल्पा संदर्भात केलेला अभ्यास, हे शाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल ह्यात दुमत नाही. तसेच या विद्यार्थ्यांच्या पालकांचेही सहकार्य आम्हाला मिळाले.'

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

सप्टेंबर महिन्यात महाविद्यालयात शिक्षण, संस्कृती आणि समाजाभिमुखतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसोबत त्यांच्या सर्जनशीलतेला आणि जबाबदारीच्या भावनेलाही चालना देणारे अनेक उपक्रम यशस्वीपणे पार पडले.

### IPR कार्यशाळा – कॉपीराईट आणि ट्रेडमार्कचे ज्ञान

१५ सप्टेंबर रोजी ॲड. समता जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली IPR विषयावर माहितीपूर्ण कार्यशाळा घेण्यात आली. १७३ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि बौद्धिक संपदा हक्कांविषयी (Intellectual Property Rights) उपयुक्त माहिती मिळवली. या सत्रातून विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरतील अशी मौल्यवान माहिती मिळाली.

### 'स्व-मुद्रा' स्वाक्षरी कार्यशाळा – दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी नवा आत्मविश्वास

१५ सप्टेंबर रोजी दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'स्व-मुद्रा' कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांनी स्पर्शाधारित पद्धतीने स्वतःची स्वाक्षरी करायला शिकले. हा उपक्रम त्यांच्या स्वावलंबनाचा आणि आत्मविश्वासाचा खरा उत्सव ठरला.

### इंफोग्राफिक पोस्टर सादरीकरण – "Digital Decorum in Focus"

१७ सप्टेंबर रोजी वोकेशनल कोर्सेस विभागाने "Digital Decorum in Corporate Settings" या विषयावर पोस्टर सादरीकरण स्पर्धा घेतली. विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट संवादातील योग्य शिष्टाचार आणि नेटिक्वेट समजून घेतले. या उपक्रमामुळे त्यांच्यातील टीमवर्क/सांघिक कार्य, सर्जनशीलता आणि डिजिटल सादरीकरण कौशल्यांमध्ये भर पडली.

### बुक रिव्ह्यू उपक्रम – वाचनातून विचारांची वाढ

१२ आणि १७ सप्टेंबर रोजी BAF विभागाने 'बुक रिव्ह्यू' उपक्रम आयोजित केला. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पुस्तकांचे विश्लेषण करून आपले विचार मांडले. या उपक्रमामुळे मुलांमधील वाचनाची आवड, चिकित्सक दृष्टिकोन आणि सादरीकरण कौशल्ये वाढली.

### संशोधन पद्धती कार्यशाळा – शिक्षकांसाठी मार्गदर्शन

१७ सप्टेंबर रोजी 'Research Methodology - Tools and Techniques' या विषयावर शिक्षकांसाठी ऑनलाईन कार्यशाळा झाली. श्री. सनी रायकवार यांनी संशोधनाची साधने आणि तंत्रे प्रत्यक्ष दाखवत शिक्षकांचे संशोधन कौशल्य वाढवले.

### संस्कृत सप्ताह – भाषा आणि संस्कृतीचा उत्सव

११ ते १७ सप्टेंबर दरम्यान संस्कृत विभागातर्फे 'संस्कृत सप्ताह' साजरा करण्यात आला. यात असत्य भाषण, पोस्टर बनविणे, गायन स्पर्धा, संवाद सादरीकरण आणि कथाकथन अशा उपक्रमांचा समावेश होता. डॉ. मृणालिनी नेवाळकर-गोसावी यांच्या पुराणेषु भक्तिरसार्णव या व्याख्यानाने विद्यार्थ्यांना पुराणांमधील भक्तिरसाची अनुभूती दिली.

### ग्रीन क्लब आणि NSS युनिटचा वृक्षारोपण उपक्रम

१८ सप्टेंबर रोजी ग्रीन क्लब आणि NSS युनिटने एक सुंदर उपक्रम राबवला – वृक्षारोपण आणि मुलाखत सत्र. डॉ. महेश बेडेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत फिटनेस आणि पर्यावरण-जागरूकतेचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी झाडे लावून हरित भविष्याची बीजे रुजवली.

### संस्कृत दिन – भक्तिरसाचा उत्सव

१९ सप्टेंबर रोजी संस्कृत दिनाच्या निमित्ताने 'चतुर्युगेषु भक्तिरसार्णव' या विषयावर कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी चार युगांवर आधारित भक्तीविषयक कथा, नाटक, नृत्य, गीत, इ. सादरीकरणांद्वारे संस्कृत साहित्याची श्रीमंती अनुभवली.

एकंदरीत, या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची विचारसरणी, आत्मविश्वास आणि सामाजिक भान अधिक दृढ झाले. सप्टेंबर महिना खऱ्या अर्थाने ज्ञान, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा साज ठरला.

### हिंदी दिन – 'हिंदीतील ए. आय. : आव्हाने आणि शक्यता'

२६ सप्टेंबर रोजी हिंदी विभागाने 'हिंदी दिन' साजरा करताना विद्यार्थ्यांना भाषा आणि तंत्रज्ञान यांचा संबंध समजावून देणारा एक विचारप्रवर्तक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुणे श्री. रमन मिश्रा आणि श्री. प्रणव कुमार यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चर्चेत ए.आय. (कृत्रिम बुद्धिमत्ता)च्या माध्यमातून शिक्षण, पत्रकारिता आणि भाषांतर क्षेत्रातील नव्या शक्यता उलगडल्या गेल्या.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### प्रथम वर्ष अभिमुखता कार्यक्रम २९ सप्टेंबर २०२५:

महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिमुखता कार्यक्रम २९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रांगणातील पेशवे सभागृहामध्ये पार पडला. यावेळी प्रभारी प्राचार्य श्रीविद्या जयकुमार यांनी तीन वर्षांत विधी अभ्यासक्रमाचा उद्देश व तयारी कशी करावी, तसेच भविष्यात उपलब्ध असलेले संधी विषयी माहिती दिली. इतर सर्व प्राध्यापकांनी प्रथम विधीचा अभ्यासक्रम, प्रात्यक्षिक विधी सेवा व इतर कार्यक्रम समितीबद्दल माहिती दिली.



### पदव्युत्तर विधी अभ्यासक्रम :

### अतिरिक्त अंतर्गत परीक्षा

**विधी महाविद्यालयातील द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष विद्यार्थ्यांचे अतिरिक्त अंतर्गत परीक्षा दिनांक १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी पार पडल्या.**

एल एल एम सत्र – II च्या विद्यार्थ्यांची सराव परीक्षा दिनांक २४ ते २७ सप्टेंबर आणि ३ व ४ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली. एल एल एम सत्र – II चे सराव वर्ग दिनांक १७ ते २० सप्टेंबर दरम्यान घेण्यात आले. तसेच एल एल एम सत्र – II चे पुनरावृत्ती वर्ग १७ ते २३ सप्टेंबर दरम्यान घेण्यात आले.

### पूर्व-संगोष्ठी तयारी कार्यशाळेचा अहवाल

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे म्युनिसिपल कौन्सिल लॉ कॉलेज, ठाणे येथील पदव्युत्तर व्यवसाय कायदा विभाग यांनी १ ऑक्टोबर २०२५ रोजी 'पूर्वसंगोष्ठी तयारी कार्यशाळा' आयोजित केली. ही कार्यशाळा येत्या फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील संगोष्ठीसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्याच्या उद्देशाने घेण्यात आली होती. या संगोष्ठीचा विषय आहे – 'बदलते नियामक परिदृश्य : व्यवसाय, कायदा आणि व्यवस्थापनावर परिणाम.'

कार्यक्रमाचे संरक्षक प्रमुख होते डॉ. विजय बेडेकर, संयोजिका डॉ. श्रीविद्या जयकुमार (सहप्राध्यापक व प्रभारी प्राचार्य) आणि समन्वयक श्री. विनोद ह. वाघ (सहाय्यक प्राध्यापक).

स्रोत व्यक्ती सी.एस. एस. एन. विश्वनाथन यांनी विद्यार्थ्यांसमोर अत्यंत उपयुक्त आणि संवादात्मक सत्र घेतले. त्यांनी कॉर्पोरेट कंप्लायन्स या विषयातील मूलभूत संकल्पना, प्रक्रिया आणि कायदेशीर आवश्यकता सोप्या भाषेत स्पष्ट केल्या. त्यांनी कंपनी सेक्रेटरीच्या भूमिकेचे

महत्त्व आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्समधील कंप्लायन्सचे स्थान यावर सविस्तर चर्चा केली.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना कंप्लायन्स प्रक्रियेचे व्यावहारिक ज्ञान मिळाले आणि कायद्याच्या अंमलबजावणीत उद्योगजगताशी असलेले नाते समजले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला व अनेक व्यावहारिक प्रश्न विचारले.

कार्यशाळा अत्यंत यशस्वी ठरली. तिने विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आणि संगोष्ठीतील सहभागाची प्रेरणा निर्माण केली. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला, ज्यामध्ये संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्या, शिक्षकवर्ग आणि स्रोत व्यक्ती यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.



**अभ्यासभ्रमण**

स्थळ : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM), पाटलगंगा

दिनांक : ०८/१०/२०२५

सहभागी : ४० विद्यार्थी आणि २ प्राध्यापक – श्री. यतीन पंडित आणि डॉ. रुपाली जमोडे

**१. प्रस्तावना**

एक सुंदर आणि उत्साही सकाळी, टी.एम.सी. विधी महाविद्यालय, ठाणे येथील विद्यार्थ्यांचा गट 'आर्थिक साक्षरता आणि भांडवली बाजाराचे वास्तव' या विषयावरील समृद्ध अनुभवासाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM), पाटलगंगा येथे शैक्षणिक अभ्यासभ्रमणासाठी रवाना झाला.

या अभ्यासभ्रमणाचे नेतृत्व आमचे समर्पित प्राध्यापक श्री. यतीन पंडित आणि डॉ. रुपाली जमोडे यांनी केले. सकाळी ८:३० वाजता वाशी येथून बसने प्रस्थान करून विद्यार्थ्यांनी शिकण्याची आणि अनुभव घेण्याची उत्कंठा बाळगली होती.

**२. प्रवास आणि आगमन**

वाशीहून पाटलगंगा कॅम्पसपर्यंतचा प्रवास अत्यंत सुखद आणि आनंददायी झाला. प्रवासादरम्यान हलका नाश्ता करून आम्ही सकाळी ९:३० वाजता NISM मुख्य कॅम्पसवर पोहोचलो. तिथे आमचे स्वागत अतिशय आत्मीयतेने करण्यात आले आणि वातावरणात शैक्षणिक ऊर्जेचा उत्साह जाणवत होता.

**३. कॅम्पस आणि कार्यक्रमाचा संदर्भ**

त्या दिवशी NISM मध्ये Financial Awareness Week (आर्थिक जागरुकता सप्ताह) साजरा होत होता. संपूर्ण परिसर बॅनर, माहितीफलक, आणि विविध प्रदर्शनांनी सजला होता. वित्तीय शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वित्तीय क्षेत्राचे महत्त्व आणि व्यवहारिक पैलू समजून घेण्याची उत्कृष्ट संधी मिळाली.

**४. पहिला सत्र –** Abakkus Asset Manager LLP **चे संचालक यांचे मार्गदर्शन**

सकाळी झालेल्या पहिल्या सत्रात बिहारीलाल

देओरा प्रतिष्ठित गुंतवणूक व्यवस्थापन संस्थेचे संचालक उपस्थित होते. त्यांचे व्याख्यान अत्यंत प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण होते. त्यांनी भारतीय भांडवली बाजारातील बदलते स्वरूप, गुंतवणूकदार शिक्षणाचे महत्त्व आणि नैतिक गुंतवणुकीची गरज याबाबत उत्कृष्ट उदाहरणांसह विवेचन केले. त्यांच्या अनुभवकथनांमुळे विद्यार्थ्यांना गुंतवणूक आणि वित्तीय निर्णय प्रक्रियेचा व्यावहारिक दृष्टीकोन समजला.

### ५. दुसरे सत्र – NISM चे प्राध्यापक जतीन त्रिवेदी यांचे शैक्षणिक सत्र

दुसऱ्या सत्रात NISM चे प्राध्यापक जतीन त्रिवेदी यांनी भांडवली बाजाराची रचना, नियामक चौकट, जोखीम आणि परतावा यांचे संतुलन, तसेच विविध मध्यस्थ संस्थांचे कार्य यावर सविस्तर भाष्य केले.

त्यांचे सादरीकरण अत्यंत सुसंगत, उदाहरणप्रधान आणि विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे होते. विधी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने, वित्तीय कायद्याचा आणि बाजार व्यवहारांचा संगम या सत्रात प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला.

### ६. तिसरे सत्र – 'Shark Tank' स्पर्धा आणि Market Fest 2025

दिवसातील सर्वांत रोमांचक सत्र होते Shark Tank Competition, जे NISM Market Fest 2025 अंतर्गत आयोजित करण्यात आले होते. आमच्या महाविद्यालयाच्या टीममध्ये अनिकेत, मुकेश, निधी आणि ऋचा यांनी सहभाग घेतला. त्यांनी Pillai College, IIBM, MIT-WPU, Amity University, Balaji Institute of Management अशा प्रतिष्ठित व्यवस्थापन संस्थांच्या टीम्सना पराभूत करून पहिला क्रमांक पटकावला.

त्यांचा आत्मविश्वास, कल्पक कल्पना आणि सादरीकरण कौशल्य पाहून परीक्षक व उपस्थित सर्वांनी त्यांचे कौतुक केले. ही कामगिरी आमच्या महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरली आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे प्रतीक ठरली.

### ७. अनुभव आणि मुख्य शिकवण

संपूर्ण अभ्यासभ्रमण ज्ञान, प्रेरणा आणि व्यवहारिक अनुभवांनी समृद्ध झाले. विद्यार्थ्यांनी केवळ आर्थिक प्रणाली समजून घेतली नाही; तर कायदा आणि वित्तीय व्यवहार यांचा परस्परसंबंधही प्रत्यक्ष अनुभवला.

- भांडवली बाजाराचे कायदेशीर पैलू अधिक स्पष्टपणे समजले.
- वित्तीय साक्षरतेचे महत्त्व आणि त्याचा दैनंदिन जीवनातील उपयोग जाणवला.
- विविध संस्थांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधून नवीन कल्पना व दृष्टिकोन मिळाला.
- 'Shark Tank' स्पर्धेतील यशाने सर्वांना प्रेरणा आणि आत्मविश्वास दिला.

### ८. आभारप्रदर्शन

या अभ्यासभ्रमणाचे यशस्वी आयोजन आणि मार्गदर्शनाबद्दल आम्ही कॉलेजच्या प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच NISM प्रशासनाचे देखील आभार, ज्यांनी आमचे अतिशय उत्तम स्वागत केले आणि उत्कृष्ट शैक्षणिक अनुभव दिला. विशेष अभिनंदन आमच्या विजेत्या टीमचे – अनिकेत, मुकेश, निधी आणि ऋचा यांचे!

### ९. निष्कर्ष

संपूर्ण अभ्यासभ्रमण हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि परिवर्तनशील शैक्षणिक अनुभव ठरले. NISM कॅम्पसवरील सत्रांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली, तर 'Shark Tank' मधील विजयाने महाविद्यालयाचा गौरव वाढवला. हा दिवस विद्यार्थ्यांच्या आठवणीत

कायम राहील आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा देईल याची खात्री आहे.




**प्राचार्य नियुक्ती :**



प्राचार्य
डॉ. श्रीविद्या जयकुमार

प्राचार्य पदाकरिता छाननी समितीची बैठक ९ ऑक्टोबर २०२५ झाली तसेच विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्तीसाठी सक्षम विद्यापीठ आणि सरकारी निवड समितीने डॉ. श्रीविद्या जयकुमार यांची शिफारस केली. तसेच, या शिफारीशमुळे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य पद २५ वर्षां नंतर भरण्यात येईल.

**स्वच्छता अभियानावरील घोषवाक्य लेखन स्पर्धा**

२ ऑक्टोबर २०२५ रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आली होती

स्वच्छता अभियान कार्यक्रम निमित्त व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे द्वारे 'घोषवाक्य लेखन स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती, ज्याचा उद्देश स्वच्छता, स्वच्छता आणि पर्यावरणीय जबाबदारीबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला, ज्यांनी विचारप्रवर्तक घोषणांद्वारे स्वच्छ आणि हरित भारतासाठी त्यांची सर्जनशीलता आणि चिंता व्यक्त केली. मौलिकता, प्रासंगिकता आणि संदेशाची स्पष्टता यावर आधारित काळजीपूर्वक मूल्यांकन केल्यानंतर, खालील सहभागींना स्पर्धेचे विजेते म्हणून घोषित करण्यात आले आहे.

प्रथम पारितोषिक: सौ. स्नेहा पवार (वर्षा दळवी) मॅडम, एफवायएलएलबी विभाग D - 'यत्र स्वच्छता, तत्र सुमुधीः।' (जिथे स्वच्छता आहे तिथे समृद्धी आहे)

द्वितीय पारितोषिक: श्री. विनोद लक्ष्मण इंगळे, टीवाय एलएलबी

दिव : C, 158 – ''एक स्वच्छता की बाजू, हजार विकास की बाजू.''

तृतीय पारितोषिक: श्रीमती रमा जनार्दन निजासुरे, TYLLB विभाग. A 43 ''स्वच्छता आपलें, निरोगी जीवन पायें! स्वच्छतेचा स्वीकार, आयुष्याला आकार! आजची स्वच्छता..... आरोग्य कायमचे!''

आम्ही स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यात अशा अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. स्वच्छता आणि नागरी जबाबदारीचा संदेश पसरवण्यासाठी प्रत्येक सहभागीने केलेल्या प्रशंसनीय प्रयत्नांबद्दल आम्ही त्यांचे कौतुक केले. आमच्या प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे समन्वय प्रा. मनोजकुमार नाईक यांनी केले आहे.

**पॉश आणि पोक्सो कायद्यावर एक दिवसीय कार्यशाळा: दि. ११/१०/२०२५ सकाळी १०.०० ते सायं. ४.३०**

महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष व विधी

सहाय्य केंद्राद्वारे पॉश आणि पोक्सो कायद्यावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वसुधा भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले होते आणि यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन केले.

सदर कार्यशाळा ही ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या उद्घाटनीयपर भाषणामध्ये जिल्हा न्यायाधीश यांनी पॉश आणि पोक्सो कायद्याचे महत्त्व व त्यामुळे होणारे बदल यावर भाष्य केले. या कायद्यामुळे पीडित व्यक्तीला एक प्रकारचे बळ मिळाले आहे. यात शिक्षा ही कठोर पद्धतीने दिलेली आहे. त्यांनी मेडिएशन आणि मेडिटेशन या वर भर दिला आणि स्पष्ट केले की, ह्या कायद्याचा उद्देश्य साज नवे पण समज, संभाषण असावे. पॉश कायद्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या त्रासापासून संरक्षण मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

यावेळेस विद्यार्थ्यांनी नाटकाच्या माध्यमातून पॉश व पोक्सो कायद्याची माहिती दिली.

पहिला सत्र मध्ये कंपनी सेक्रेटरी स्वाती निवालकर यांनी पॉश या कायद्यावर सखोल माहिती दिली. शाळेमध्ये पॉश समिती स्थापना करण्यापासून ते तक्रारी हातळण्यापर्यंतची प्रक्रिया त्यांनी समजून सांगितली. स्वाती मॅडम नि समितीद्वारे वार्षिक अहवाल दाखल करण्याबद्दल पण माहिती दिली.

दुसऱ्या सत्रामध्ये सरकारी वकील श्रीमती गीता शर्मा यांनी पोक्सो या कायद्यावर माहिती दिली. शाळा व महाविद्यालयामध्ये शिक्षकांनी काय काळजी घ्यावी याचे विवरण दिले. त्यांनी शाळेच्या शिक्षकांच्या भूमिकेवर आणि त्यांचा विद्यार्थी जीवनावर होणाऱ्या प्रभावाबद्दल सांगितले. मागील काही दिवसांमध्ये शाळेमध्ये अशा घटना घडल्याचे आपणांस माहिती आहे. अशावेळी बालकांना लैंगिक छळापासून वाचविण्यासाठी हा कायदा कशाप्रकारे मदत करतो, तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे पारित आदेशाप्रमाणे शिक्षकांनी काय साली घ्यावी, असे प्रकरण कसे हाताळावे याची माहिती दिली.

सर्व उपस्थित पार्टीसिपंटस्ना सर्टिफिकेटचे वाटप केले गेले.

यावेळेस महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी कार्यशाळेच्या रुपरेषा मांडली. प्रा. हेतल मिशेरी यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख पाहण्याची ओळख श्रीमती कृष्णा कामथ, तर आभार प्रदर्शन विनोद एच वाघ यांनी केले.



**१५ ऑक्टोबर : 'वाचन प्रेरणा दिवस'**

विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना 'अवांतर वाचनाचे महत्त्व समजावे आणि त्यांनी आपले वाचन कौशल्य वाढवावे' ह्या करिता वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.०० वाजता 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' ह्या महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या मोहिमे अंतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयीन अंतर्गत परीक्षा सुरू असताना देखील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेच्या सुरुवातीला प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

केले व वाचनाचे महत्त्व समजून सांगितले. परीक्षकाची जबाबदारी सहाय्यक प्राध्यापक रुपाली जामोदे ह्यांनी पार पाडली. कु. शर्मिला तोडकर तृतीय वर्ष विधी आणि कु. ज्योती पाटील प्रथम वर्ष विधी ह्यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल शीतल सोनावणे ह्यांनी केले.



२० ऑक्टोबर २०२५ ते ५ नोव्हेंबर २०२५ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठातून दिवाळी निमित्त सुट्टी.

शुल्क नियमन प्राधिकरणाचा २०२६-२०२७ शुल्काचा प्रस्ताव ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सादर करण्यात आला.

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतन**

**पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये विद्यार्थ्यांचा विजय**

शक्ती, सहनशक्ती आणि दृढनिश्चयाचे उल्लेखनीय प्रदर्शन करताना, AR विभागातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी श्री. राज लवांडे यांनी २७-१०-२०२५ रोजी कळवा येथील मनीषा विद्यालयात आयोजित Under ५३ किलो वजनी गटात पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप जिंकून VPMCOE ला गौरव प्राप्त करून दिला.

हा कार्यक्रम पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने आयोजित केला होता, ज्याला वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग फेडरेशन, लंडन, U.K. द्वारे देखील मान्यता प्राप्त आहे.

अनेक बलाढ्य स्पर्धकांशी स्पर्धा करताना; राजने बेंच प्रेस आणि डेड लिफ्ट दोन्ही स्पर्धांमध्ये अपवादात्मक कौशल्य दाखवले. त्याने डेड लिफ्टमध्ये १८२.५ किलो वजन उचलून आणि ७० बेंच प्रेस पूर्ण करून त्याच्या श्रेणीत विजेतेपद मिळवून असाधारण कामगिरी केली.

त्याच्या कामगिरीने केवळ त्याची शारीरिक ताकदच दाखवली नाही; तर त्याची शिस्त, कठोर प्रशिक्षण आणि उत्कृष्टतेची वचनबद्धता देखील प्रतिबिंबित केली. या यशामागे महिन्यांचे शिस्तबद्ध प्रशिक्षण, कठोर आहार नियंत्रण आणि अढळ मानसिक एकाग्रता आहे. हा विजय महाविद्यालयासाठी अभिमानाचा क्षण आहे आणि भविष्यातील स्पर्धांमध्ये त्याला यश मिळावे अशी शुभेच्छा कॉलेजकडून व्यक्त करण्यात आली.






**७ नोव्हेंबर २०२५ – वंदे मातरम् गीत १५० वर्ष पूर्णत्व सोहळा**

महाविद्यालयामध्ये ‘वंदे मातरम्’ या भारतीय स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या राष्ट्रगीतासमान गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एका

वैशिष्ट्यपूर्ण आणि देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. या सोहळ्याचा प्रारंभ इंडस्ट्रीअल इलेक्ट्रोनिक्स विभाग प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे यांनी मराठी वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री श्रीयुत अमित शहा यांच्या 'वंदे मातरम्' या विषयावरील लेखाचे वाचन करून केला. प्रस्तुत लेखामध्ये वंदे मातरम् गीताची निर्मिती, त्यामागील ऐतिहासिक व सांस्कृतिक अर्थ, तसेच भारतीय जनमानसावर झालेला प्रभाव याचे सुंदर विश्लेषण होते. लेखातील विचारांनी कार्यक्रमाला एक अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी प्रारंभ मिळाला.

यानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक व उपस्थितांनी सामूहिकरित्या वंदे मातरम् हे गीत सादर केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी वर्गाने संपूर्ण वंदे मातरम हे संस्कृत मधील गीत गायनाचा चार दिवस सराव केला होता. त्यांच्या उत्कृष्ट गायनाने सभागृहात वातावरण भारावून गेले आणि देशभक्तीची गाणी, जयघोष आणि उत्साहाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

प्राचार्य डॉ. डी. के. नायक व विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अशा उपक्रमांमधून देशभक्ती, सांस्कृतिक परंपरा आणि एकता दृढ करण्याचे आवाहन केले.









एकंदरीत हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, अनुकरणीय व यशस्वी ठरला.

अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी देशप्रेमाने वंदे मातरम् गीताचा १५० वर्षांचा गौरवशाली प्रवास अभिमानाने साजरा केला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था




९ ऑक्टोबर २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांची एजेएमसी (एशियन जर्नल ऑफ मॅनेजमेंट केसेस) या स्कोपस अनुक्रमित नियतकालीक तर्फे समीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली; आणि 'एशियन पेंट्स: कॅन द मार्केट लीडर अप अप सेल्फ अगेन्स्ट बिर्लाज मॅग्नम ओपस?' या केस स्टडी साठी त्यांनी केलेल्या समीक्षणासाठी त्यांना प्रमाणपत्र मिळाले.

**१० ऑक्टोबर २०२५ : 'इंटिग्रेटींग इंडियन नॉलेज सिस्टीम (आय के एस ) टू मॉडर्नाइझ बिझनेस मॅनेजमेंट प्रॅक्टिस थ्रू इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी' या विषयावरील परिषदेची पूर्वार्ध कार्यशाळा**

डॉ. व्ही. एन. ब्रिम्स (BRIMS) (स्वायत्त) व इन्स्टिट्यूट फॉर ओरिएंटल स्टडी, ठाणे यांच्या सहकार्याने, 'इंटिग्रेटींग (आय के एस) इंडियन नॉलेज सिस्टीम टू

मॉडर्नाइझ बिझनेस मॅनेजमेंट प्रॅक्टिस थ्रू इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी' या विषयावरील परिषदेची पूर्वार्ध कार्यशाळा शुक्रवार, १० ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली.

विद्यार्थी आणि प्राध्यापकसाठी हा कार्यक्रम दोन सत्रात आयोजित करण्यात आला होता.

पहिल्या सत्रात डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे संचालक, डॉ. नीतिन जोशी, यांनी प्रमुख अतिथी व मान्यवरांचे स्वागत केले.

या कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. स्मिता जपे यांनी कार्यशाळे संबधी प्रस्तावना करून; पारंपारिक भारतीय ज्ञान प्रणालींचे आधुनिक व्यवसाय पद्धतीं सोबत एकत्रीकरण करण्याचे महत्त्व अधोरेखित करणे, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान यांचा वापर करून शाश्वत आणि भविष्यसूचक असे सक्षम व्यवस्थापन प्रारूप तयार करणे यावर चर्चा, तसेच परिषदेच्या विषय सूत्राबद्दल माहिती आणि जागरूकता निर्माण करून प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना शोधनिबंध, लेख लिहून किंवा सादरीकरणे तयार करून सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे असे सांगितले.

या कार्यशाळेला सौ. सुमेधा बेडेकर, ब्रिम्सचे महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

आयआयटी आणि आयआयएमचे माजी विद्यार्थी, प्रतिष्ठित अभ्यासक, एक सुप्रसिद्ध डिजिटल निर्माता, यूट्यूबर आणि पॉडकास्टर, श्री. यशोदीप देवधर, यांना या कार्यशाळेचे प्रमुख अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी '२१ व्या शतकातील जीवन आणि व्यवसायासाठी वाल्मीकी रामायणाचे धडे' या विषयावर अतिशय सुंदर व्याख्यान दिले. रामायण म्हणजे कालातीत युगाशी संबंधित महाकाव्य पण; वाल्मीकी लिखित रामायण हे आपल्याला लहानपणापासून रामायणाच्या ऐकत असलेल्या गोष्टींपेक्षा खूप वेगळे आहे. आणि त्या संबधी श्री. देवधर यांनी खूप अभ्यासपूर्ण विवेचन आपल्या व्याख्यानात सादर केले. तसेच उपस्थित श्रोत्यांनी विचारलेल्या अनेक प्रचलित समज, गैरसमज, शंका याबद्दल देखील वाल्मीकी रामायणाच्या संदर्भाने सुसंगत असे निरसन सादर केले.

दुसऱ्या सत्रामध्ये या पूर्वार्ध कार्यशाळेचे एक भाग म्हणून ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे 'रूट टू रिव्होल्यूशन' नावाची वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली.

विजेत्या विद्यार्थ्यांना पदके व स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

डॉ. कांचन अक्षय यांनी आभारप्रदर्शन केले व कार्यशाळेची सांगता करण्यात आली.







१६ ऑक्टोबर २०२५: डॉ. कांचन यांनी डॉ. बापट आणि प्रा. अदिती यांच्यासमवेत, द्वितीय वर्षाच्या एचआर आणि ऑपरेशन विद्यार्थ्यांसह नवी मुंबईतील ऐरोली येथील गेब्स हेल्थकेअर लिमिटेडला भेट दिली.

तेथील मानव संसाधन विभागाच्या (एचआर) व्यवस्थापकांशी संवाद साधण्यासाठी आणि तेथील व्यवस्थापन प्रक्रिया समजून घेण्याच्या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.




२२ ऑक्टोबर २०२५ : एमराल्ड पब्लिशिंगच्या 'डोमेस्टिक क्रेडिट इफेक्ट ऑन न्यू बिझनेस डेन्सिटी इन द हाय अँड मिडल-इंकम कंट्रीज' या शोध निबंधाच्या समीक्षणासाठी स्कोपस अनुक्रमित नियतकालिक : जर्नल ऑफ फायनान्शियल अँड इकॉनॉमिक पॉलिसीसाठी डॉ. स्मिता जपे यांना समीक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले.

२८ ऑक्टोबर २०२५ : ताज विवंता वाशी येथे आयोजित एल्सेव्हियर कनेक्ट २०२५ मध्ये 'हार्नेसिंग सायन्स डायरेक्ट फॉर इन्स्टिट्यूशनल एक्सलन्स डिजिटल इनोव्हेशन अँड रिसर्च व्हिजिबिलिटी' या विषयावरील चर्चासत्रासाठी डॉ. स्मिता जपे यांना तज्ज्ञ सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.



३० ऑक्टोबर २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी ८३% गुणांसह एआयसीटीई एनआयटीटीआर परीक्षेच्या मॉड्यूल ५ - तंत्रज्ञान-सक्षम हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

त्यांनी आतापर्यंत एआयसीटीई एनआयटीटीआरचे सर्व आठ मॉड्यूल यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत.



२७ ऑक्टोबर २०२५ : एमएमएस २०२५-२७ च्या पहिल्या वर्षाच्या चाणक्य तुकडीच्या विद्यार्थिनी; साची कारेकर आणि स्नेहा धारा यांनी फायनान्स वेद या संस्थे तर्फे आयोजित केलेल्या 'मार्केथॉन २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन मार्केटिंग द्वितीय उपविजेता संघाचे स्थान पटकावले. या स्पर्धेत १६० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. त्यांना बक्षीस म्हणून इंटर्नशिपची संधी मिळणार आहे.







•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०
Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.